प्रकरण तिसरे :

# अश्विनी धोंगडे ह्यांच्या 'स्त्रीसूक्त' (१९८८) व 'अन्वय' (१९९२) ह्या कवितासंग्रहांचे आशयविशेष

प्रकरण तिसरे :

# अश्विनी धोंगडे ह्यांच्या 'स्त्रीसूक्त' (१९८८) व 'अन्वय' (१९९२) ह्या कवितासंग्रहांचे आशयविशेष

३.१. प्रास्ताविक

३.२. 'स्त्रीसूक्त' व 'अन्वय' ह्या कवितासंग्रहाचे आशयविशेष

- ३.२.१ स्त्रीजीवनाचे विविधांगी दर्शन
- ३.२.२ कौटुंबिक नातेसंबंधातून येणारे अनुभव
- ३.२.३ नोकरी-व्यवसायातून येणारे अनुभव
- ३.२.४ विवाहसंस्थेतून आलेले अनुभव
- ३.२.५ स्त्री-पुरुष संबंधातून येणारे अनुभव
- ३.२.६ स्त्रीमुक्ती चळवळ व स्त्रीवादी ह्या अनुषंगाने आलेले अनुभव
- ३.२.७ महानगरीय संवेदना
- ३.२.८ सामाजिक जाणीव

३.३. समारोप

३.४. संदर्भ व टीपा

## ३.१. प्रास्ताविक :

मराठी कवितेची वाटचाल व तिच्यातील साठोत्तरी मराठी कवयित्रींचे स्थान अभ्यासल्यानंतर ह्या तिसऱ्या प्रकरणामध्ये आपण अश्विनी धोंगडे ह्यांच्या 'स्त्रीसूक्त' व 'अन्वय' ह्या कवितासंग्रहाचे आशयविशेष ह्यांचा शोध घेणार आहोत. अश्विनी धोंगडे ह्यांनी स्त्रीजीवन ह्या एकाच विषयावर भरपूर कविता लिहिल्या आहेत. पैकी 'अन्वय' त्या कवितासंग्रहांतून स्त्री-पुरूष तुलना, सामाजिक जाणीव, महानगरीय संवेदनाही व्यक्त झाल्या आहेत. म्हणून आशयसूत्रे निश्चित करून अभ्यास करणे योग्य होईल. त्यासाठी स्त्रीजीवनाचे विविधांगी दर्शन, कौटुंबिक नातेसंबंध, नोकरी व्यवसाय, विवाहसंस्थेतील अनुभव, स्त्री-पुरूषसंबंध तुलना, स्त्रीमुक्ती चळवळ, स्त्रीवादी जाणिवा विचार, सामाजिक जाणिवा, महानगरीय संवेदना अशी आठ आशयसूत्रे निश्चित करून अभ्यास करूया.

## ३.२. 'स्त्रीसूक्त' व 'अन्वय' ह्या कवितासंग्रहांचे आशयविशेष :

अश्विनी धोंगडे ह्यांनी आपल्या कवितेतून स्त्रीजीवनाचे अनेक पदर उलगडले आहेत. त्यामुळे आधुनिक जगातील महानगरीय, विशेषत: मराठी स्त्रियांचे जीवन कसे आहे, ह्यावर प्रकाश पडला आहे. शिवाय त्यांचे जीवनविषयक मानवतावादी चिंतनही व्यक्त झाले आहे. तसेच जीवनाकडे बघण्याचा स्वतंत्र दृष्टिकोन व्यक्त झाला आहे. स्त्रीच्या जागृतीचा विचार हे सामाजिक बदलासाठी केलेले एक प्रकारचे आवाहन आहे. सामाजिक वास्तवाला नेमकी पकडून धरणारी अविश्वनी धोंगडे ह्यांची कविता वस्तुनिष्ठ पातळीवरून समाजाचे दर्शन घडवते ते आता पाहू.

### ३.२.१ स्त्रीजीवनाचे विविधांगी दर्शन :

'स्त्रीसूक्त' (१९८८) हा अश्विनी धोंगडे ह्यांचा पहिला कवितासंग्रह असून ह्यात ५८ कवितांमधून नुसत्या स्त्रीस्वातंत्र्याचा नव्हे, तर स्त्रीच्या जागृतीचा विचार अत्यंत ठसठशीतपणे, प्रगटपणे, जाहीरपणे, स्पष्टपणे, रोखठाकपणे आपल्यापुढे येतो. मूळ कवितांमधील वैचारिक जोरकसपणामुळे ह्या कविता आपले लक्ष वेधून घेतात. कवितासंग्रहाचे 'स्त्रीसूक्त' हे शीर्षक कवितांच्या अनुषंगाने अर्थपूर्ण आहे. 'सूक्त' ह्या शब्दाने संस्कृत ऋचांचा (सूक्तांचा) आपल्या मनात जागा होणारा संदर्भ व जुन्या काळात स्त्रीला प्राप्त होत राहिलेले स्वातंत्र्य (गार्गी, मैत्रेयी) आणि आजच्या काळातील स्त्रीजीवन ह्यातील विरोधाभास स्पष्ट होतो. ह्यादृष्टीने ह्या संग्रहाच्या सुरूवातीलाच कवयित्रीने ऋग्वेदातील सूक्तांची केलेली मांडणी ही कवितांमधील आशयाशी संवादी, विसंवादी भाववृत्तीचे आंदोलन वाचकांच्या मनात निर्माण करते. पहा :

> ''मी आहे ब्रह्मांडाची अधीश्वरी
> जीवांना कर्माचे फळ भोगविणारी
> जीवांना ऐश्वर्य बहाल करणारी
> मी चेतन आहे, सर्वज्ञ आहे.
> हे अखिल विश्वही माझीच विभुती आहे.''[१]

ऋग्वेदातील वागांभृणीक सूक्त आणि प्रस्तुत 'स्त्रीसूक्त' ह्यात जमीन-अस्मानचे अंतर आहे. ह्यासंदर्भात सुजाता शिरवळकर महाजन म्हणतात, 'वागांभृणी (ऋग्वेद) सूक्ताप्रमाणे स्त्रीचे आजचे अस्तित्व उरलेले नाही. ती उरलीय फक्त एक यंत्र म्हणून. तडजोडीने जीवन जगणे हा तिचा धर्म युगांपासून चालत आलेला आहे. पण या युगातली तिची तडजोड तिचे

व्यक्तिमत्त्व दुभंगून टाकणारी आहे.''[२] सुजाता शिरवळकर महाजन यांचे हे मत 'स्त्रीसूक्त' च्या संदर्भात समर्पक असेच आहे.

एकूणच वाङ्मयातून होणारे स्त्रीचे दर्शन हे अवास्तव आहे. त्यामुळे ह्या कवयित्रीची 'फिर्याद' आहे. ती अशी :

''जिने प्रेमाच्या भाकड कल्पनांना
अंजारून गोंजारून चांदण्याचे आरसेमहाल
पोकळ अलंकारांनी सजवले, नटवले
जिने आयुष्याचे नागडे सत्य
उलगडून कधीच धरले नाही समोर
त्या कवितेवर तिची फिर्याद आहे.
जिने फसविले स्वत:च स्वत:लाच.''[३]

'स्त्रीसूक्त' च्या प्रथम आवृत्तीला प्रस्तावना नाही. (प्रकाशन काल : १७ फेब्रुवारी १९८८). ह्या संदर्भात अश्विनी धोंगडे म्हणतात, ''फिर्याद' ही या संग्रहातील पहिली कविता हीच या कवितांमागील भूमिका व्यक्त करण्यास मला पुरेशी वाटली.''[४] 'स्त्रीसूक्त'च्या द्वितीय आवृत्तीच्या (१९९७) निमित्ताने मात्र प्रस्तावनेमध्ये कवयित्रीने आपले मत मांडले आहे. अश्विनी धोंगडे ह्यांची ही भूमिका योग्यच वाटते. 'अन्वय' (१९९२) ह्या कवितासंग्रहांच्याही प्रथमावृत्तीला प्रस्तावना नाही. परंतु ह्या कवितासंग्रहातील पहिलीच कविता 'धन्यो स्त्रीजन्म' ठामपणे स्त्रीवादी भूमिका, स्त्रीवादी भाष्य अभंग ओवीच्या देशीय शैलीत प्रकट करताना दिसते.

'स्त्रीसूक्त' व 'अन्वय' ह्या दोन्ही कवितासंग्रहांमधून स्त्रीचे दु:ख, वेदना आजची आधुनिक स्त्री व स्वत:चे स्वतंत्र व्यक्तित्व प्रस्तापित करण्यासाठी तिची चाललेली धडपड आणि संघर्ष ह्या कवितांमधून वास्तवाच्या पातळीवर प्रथमच चित्रित झालेला आहे. आधुनिक

जगातील महानगरीय नोकरदार स्त्री मराठी कवितेत अश्विनी धोंगडे ह्यांच्या कवितेच्या रूपाने प्रथमच अवतरली आहे.

पारंपारिक मूल्यांना छेद देणाऱ्या 'स्त्रीसूक्त' ह्या संग्रहांत आपल्याला भावकविता भेटत नाही. स्त्रीचे खरेखुरे आयुष्य, खरेखुरे स्वरूप येथे दिसते. स्त्रीजीवन विविध पातळ्यांवर आविष्कृत केले आहे. 'स्त्रीसूक्त' मधून स्त्रीजीवन ह्या एकाच विषयावर लिहिलेल्या कवितांमधून वेगवेगळ्या भूमिका, तिच्या जबाबदाऱ्या, पुरूषप्रधान कुटुंबव्यवस्थेत तिचा होणारा शारीरिक, मानसिक कोंडमारा ह्या सर्व बाबी ह्यात प्रभावीपणे व्यक्त झाल्या आहेत.

प्राचीन काळापासून स्त्री ही एक उपभोग्य वस्तू आहे, असे स्वार्थी, लंपट पुरुष समजत आला आहे. कवयित्रीने समाजाचा समाचार 'स्त्रीसूक्त' मधील 'स्त्री', 'गृहिणी', 'बलात्कार', 'रुपकंवर', 'विटंबना', 'छोट्या जाहिराती', 'अवलंबिता', 'काल आणि आज' ह्यासारख्या कवितांमधून घेतला आहे व त्यांनी मार्मिकपणे स्त्रीजीवन चित्रित केले आहे. स्त्रीचा उपभोग अनेक पातळ्यांवरून घेतला जातो. 'स्त्री' ह्या कवितेत पहा :

"कोणी चुटपुटत्या स्पर्शासाठी
गर्दीतही चाटून गेलं
कोणाच्या नजरेनं कधी फाडून खाल्लं
कोणी अधूनमधून फोन करून समाधान मानलं
कोणी चर्चेच्या गोंडस नावाखाली
सहवासाची ऊब पीत राहिलं
कोणी नावालाच गोंजारून
कल्पनेनं चुंबून घेतलं."[५]

धावपळीच्या ह्या जीवनात आपण काय मिळवले व काय विकले हे स्त्रीला कळत नाही. 'गृहिणी' ह्या कवितेतही असाच आशय व्यक्त झाला आहे. सर्वजण तिचा उपभोग

15191

घेतात, सर्वांचा तिच्यावर हक्क असतो. तिच्या हक्काचे, मालकीचे मात्र काहीच नसते, हे मार्मिक उदाहरणांमधून कवयित्रीने व्यक्त केले आहे. पहा :

> ''तिचा मूड असो नसो
> भोज्याच्या खांबासारखी ती असते मध्यावर
> असते ती हक्काची सर्वांच्या
> पण तिचा हक्क नसतो कुणावर''[६]

कवयित्रीला स्त्रीजन्म म्हणजे एक कोडे वाटते. ती ज्याच्यासाठी धडपडते त्याच्या संसारात तिला अटळ स्थान आहे का ह्या प्रश्नाचे उत्तर 'नाही' असेच मिळते. स्त्री आपला पती वारल्यानंतर विधवा जीवन जगते. परंतु पुरुष मात्र महिनाभरात दुसरे लग्न थाटामाटात करून दुसरीशी एकरूप होतो. म्हणूनच 'रूपकंवर' ह्या कवितेत कवयित्री म्हणते,

> ''बाई गं, तू एक कोडे आहेस
> ज्या देवाच्या परलोकातील सुखासाठी
> तू जळत्या यातनांतून पार होतेस
> त्याच देवाच्या आधी
> तू प्राण ठेवले असतेस तर
> त्याने महिनाभरातच आणली असती
> तुझीच कोणी सखी
> धामधुमीने मिरवत अग्नीच्या साक्षीने''[७]

येथे समाजातील वास्तव सूक्ष्मपणे कवयित्रीने टिपले आहे. समाजातील अनेक दु:खापेक्षा तिला अग्नीत जीवन झोकून देणे अधिक सुखाचे वाटते. 'विटंबना' ह्या कवितेत कवयित्री समाजाला उद्देशून म्हणते, 'तिचे सती म्हणून मंदिर बांधू नका. तिच्या अग्नीत

सर्मपण होण्यापूर्वीच्या यातना लक्षात घ्या. तिला देवी करू नका, माणूस करा. मग कळेल जीवंत जळताना काय यातना होतात ते.

घरापासून दूर झालेल्या स्त्रीचे दु:ख व स्त्रीजन्माच्या विविध टप्प्यांवर स्त्री आणि बाहेरचे जग ह्यांच्यामध्ये येणारा संघर्ष ह्या सर्वांचे चित्रण 'त्यानंतर' ह्या कवितेत आलेले आहे. एका तटस्थ दृष्टिकोनातून स्त्रीजीवनाचे बदलते स्वरूप, स्त्रीला होणारी स्वत:च्या शरीराची जाणीव 'बॉन्साय', 'गरजा', 'त्यानंतर', 'स्त्रीजन्म', 'कॅक्टस' ह्यासारख्या कवितांमधून प्रभावीपणे व्यक्त झाली आहे. पैशामुळे स्त्रीचे राहणीमान सुधारले. मात्र तिची वैचारिक पातळी काहीच सुधारली, उंचावली नाही. नवऱ्याच्या तोलामोलात राहताना तिच्या आयुष्याचे रस्ते पैशांच्या मापाने उंचावत जातात. काहीही करून तारुण्य टिकविण्याचा आटोकाट प्रयत्न करणाऱ्या ह्या स्त्रीच्या आयुष्याचेच वयाची उंची कापताकापता 'बॉन्साय' झाले आहे 'बॉन्साय' ही कविता कृत्रिम तरुणपणाला येणारे खुजेपण व्यक्त करणारी आहे. पहा :

"केसांना काळा डाय लावून
तिने आपले तरुणपण रोखून धरले
ओठांना लाल लिपस्टिक लावून
भुवया नीट कोरून काढून
ब्युटी पार्लरमध्ये फेशल करून
रेशमी वस्त्रे अंगावर लपेटून
गरम रक्त सळसळत ठेवले
वयाची उंची कापता कापता
आयुष्याचेच बॉन्साय झाले."[८]

'बॉन्साय' कवितेबद्दल अश्विनी धोंगडे म्हणतात, "माझ्याच जातीची मी टीका करत नव्हते. त्यात आत्मपरीक्षण होते."[९] अश्विनीताईंची ही भूमिका स्त्रीजीवन यथार्थपणे व्यक्त करणारी वाटते.

एका बाजूला प्रत्येक लहान-मोठ्या गोष्टीच्या प्राप्तीसाठी स्त्री तिच्या स्त्रीत्वाचा 'असेट' म्हणून वापर करताना दिसते, तर दुसऱ्या बाजूला सुखाने माणूस म्हणून मुक्त जगण्यासाठी स्वत:च्या शरीराचा अडसर तिला वाटतो. 'स्त्रीजन्म' ही कविता ह्याचा उत्कृष्ट नमुना म्हणून येथे उद्धृत करता येईल :

"सोहाळे स्त्रीत्वाचे
अंगाखांद्यावर मिरवले
त्याच्याच भांडवलावर
आयुष्याला भोगले
दुसऱ्याच्या नजरेनं
स्वत:चा देह मिरवला
आरशाला रूपाचाच
सवाल विचारला
देहाचे समाधान
आयुष्याचे ध्येय झाले
रात्रीचे स्वप्न
दिवसाचे दिवाभीत ठरले."[१०]

स्वत:च्या शरीराची ही जाणी स्त्री अगदी वार्धक्यातही विसरू शकत नाही, असे कवयित्रीला वाटते. 'त्यानंतर' ह्या कवितेत हे लक्षात येते,

"स्त्रीत्वाची सारी बंधने
तोडून, मोडून, फेकून दिली
हा जन्मच असा खडतर
शरीराची जाणीव कधीच नाही विरली."[११]

स्त्रीने काय करावे, काय करू नये, हे समाज सांगतो. कितीही नकोसे वाटले, तरी तिला तसेच जगणे आवश्यक आहे. बंधनापलिकडचे स्त्रीमुक्तीचे तिचे विचार केवळ स्वप्नातच राहतात. 'नको बाई' ह्या कवितेत स्त्रीची मर्यादा अशाप्रकारे व्यक्त झाली आहे. पहा :

> ''तू अशी ओतू जाईस्तो हसू नकोस
> डोळे मोडत पारदर्शी बोलू नकोस
> नको दिसूस फार लोभसवाणी
> जाता येता नकोस गुणगुणू सिनेमातली गाणी
> नकोबाई घालूस कपडे लक्ष वेधणारे
> हातवारे नको करुस मन मोहणारे
> नको येऊस रात्री उशीरा घरी
> बंधनापलिकडचे मुक्त जग
> स्वप्नातच केवळ असते सोबतीला''[१२]

स्त्रीजीवनाचे विविधांगी चित्रण करत असताना कवयित्रीने 'स्वस्त' ह्या कवितेत कथा, कादंबरी, कविता, चित्रपट ह्यांचीतील स्त्रीपेक्षा वास्तवातील, प्रत्यक्षातील स्त्रीची किंमत काय आहे, हे मार्मिक उदाहरणांमधून व्यक्त केले आहे. पहा :

> ''प्रत्यक्षातली स्त्री फार फार स्वस्त असते
> हुंडाबळी घेणाऱ्याला दुसऱ्या लग्नाची काळजी नसते''[१३]

'स्त्रीसूक्त' ह्या संग्रहात आढळणारे स्त्रीचे आणखी एक अंग म्हणजे पारंपरिक विचारांचा पगडा किंवा वहिवाटीने जगणारी स्त्री होय. ही स्त्री स्वत:साठी काहीच करत नाही. पती व मुलांसाठी राबण्यात तिला धन्यता वाटते. बाईपणाची धुंदी केव्हा उतरणार आणि

आपणही माणूस आहोत, त्याची जाणीव होणार कधी, अशी खंत कवयित्रीने 'धुंदी' ह्या कवितेत पुढीलप्रमाणे व्यक्त केली आहे.

> ''त्यागाचे डोंगर चढण्यात
> तिला वाटतो स्वत्वाचा अभिमान
> अपमानाची दगडी जखम
> तिला वाटते स्त्रीत्वाची निशाणी
> त्याच्या सुखांसाठी स्वत:चा बळी जाताना
> तिला वाटतो आपला गौरव
> थकलेला देह त्याने कुरवाळताना
> वाटते तिला बाईपणाची इतीश्री
> मनावरची ही धुंदी कधी उतरलीच तर,
> दिसेल तिला तिचे पाय मातीचे होते.''[१४]

'वहिवाट' ह्या कवितेतही पारंपरिक पद्धतीचे स्त्रीजीवन तिच्या वयातील प्रत्येक टप्प्यासह सूक्ष्मपणे टिपण्यात कवयित्री यशस्वी झाली आहे. स्वत:च्या मनाप्रमाणे वागणारी, बोलणारी स्त्री 'बायकी' ह्या कवितेत दिसते. स्वत:च्या छोट्या-मोठ्या दु:खांना गोंजारणात हळव्या चिंतांना कुरवाळण्यात कित्येक बायकांचा जन्म जातो. स्त्रीच्या लहरी स्वभावाचे एक वेगळे चित्रण कवयित्रीने अप्रतिम रेखाटले आहे.

अश्विनीबाईंच्या कवितेत आणखी एक स्त्रीचे रूप बघायला मिळते ते म्हणजे वाढत्या महागाईच्या काळात, धावपळीच्या जीवनात ती गाणे विसरली आहे. तिला फक्त पाढे येतात. ती ताल विसरली आहे. तिला फक्त तोलच समजतात. ती भाव विसरली आहे. तिला फक्त शब्द समजतात. ती काव्य विसरली आहे. तिला फक्त हिशोब येतात. 'गद्यमय' ह्या शीर्षकाच्या कवितेमध्ये आजच्या व्यवहारी स्त्रीचे उत्कृष्ट व अर्थपूर्ण जीवन स्पष्ट झाले आहे.

'स्त्रीसूक्त'कर्त्या अश्विनी धोंगडे ह्यांच्या 'अन्वय' ह्या दुसऱ्या कवितासंग्रहांमध्ये 'शृंगार', 'सूर्य', 'तीन कविता तिच्या', 'आतबाहेर', 'ते तसले हसे', 'व्यवहार', 'मी', 'झापडे', 'कारावास', 'मृत', 'सरताना', 'झिडकारून', 'नाते', 'निर्बुद्ध', 'दु:ख', 'सुसंस्कृत', 'पोचे आलेल्या', 'मरण सोहळा', 'प्रश्न', 'सखे', 'काठाकाठाने' इत्यादी कवितांमधून स्त्रीजीवनामधील विविधांगी अनुभव प्रखरतेने अवतरले आहेत. 'शृंगार', 'मी', 'झापडे', 'कारावास', 'मृत', 'नाते', 'दु:ख', 'सुसंस्कृत', 'मरण सोहळा', 'प्रश्न' ह्या कवितांमधून स्त्रीमनाची घुसमट किंवा कुचंबणा तीव्रतेने व्यक्त झाली आहे. स्त्रीने कोणता शृंगार करावा, हे सांगताना कवयित्री 'शृंगार' ह्या कवितेत म्हणते,

"फुले करून
राग माळून घ्यावा
कडू बोलणी
कर्णफुले करून
टांगून टाकावीत
बोचरे डोळे
जळके तिरस्कार
माळावेत फुलवून
लांबरुंद गळाभर"[१५]

अबोल शब्दांचा साज काकणभर ल्यावा, स्त्री कुटुंबातील सर्वांच्यासाठी जळत असते, झुरत असते. पतीच्या सुखासाठी सर्वकाही निमूटपणे सहन करत असते. असे तिचे जगणे स्वत:साठी नसून इतरांसाठीच असते. 'तीन कविता - तिच्या' मधील पुढील काव्यपंक्ती पहा:

"ती उणे करून स्वत:ला
जगली उण्यापुऱ्या चारचौघांसाठी"[१६]

स्त्रीजीवनाचे टप्पे येथे सांगताना स्त्रीजीवनाविषयीचे प्रगट चिंतन येथे व्यक्त झाले आहे. स्त्री ही पुरुषाच्या शरीराची भूक भागवते, वंशाला दिवा देते. इतके करूनही तिचे भविष्य अंधारमय असते. पुरुष हा मुक्तपणे जगत असतो. तिला मात्र मुक्तपणे जगता येत नाही. शेवटपर्यंत तिच्या जीवनात अनेक जीवघेणी वादळे धुमसत असतात. स्त्रीजीवनाच्या अवमूल्यनाबद्दलचे कवयित्रीचे हे उद्‌गार अंगावर शहारे आणणारे आहेत. स्त्रीचे घरातील जीवन व घराबाहेरील जीवन ह्यात प्रचंड विरोधभास असल्याने त्यात तिची जी घुसमट होते ती 'आतबाहेर' ह्या कवितेमध्ये कवयित्रीने रेखाटली आहे. स्त्रीच्या अंतर्मनातील दु:खाचे चित्रण 'मी' ह्या कवितेमध्ये कसे आले आहे हे पहा :

> ''मी जळले अंतर्यामी
> परी जाळिले न कोणा
> मी उभी पेटले
> परी दाविल्या न खुणा
> घाव घणाघण असे सोशिता
> मी मुकी राहिले उगी
> मिटून घेतले पंख असे हे
> उघडायचे न आता कधी.''[१७]

स्त्रीच्या जीवनातील दु:ख, वेदना भयानक स्वरूपाच्या आहेत. मरता येत नाही म्हणूनच ती जगते आहे. दु:ख पचवण्याचा आटोकाट प्रयत्न तिने करावा, असा उपरोधपूर्ण उपदेश कवयित्री 'झापडे' मध्ये पुढीलप्रमाणे करते,

> ''तू प्रयत्न कर
> वेदनांना क्षय व्हायला हवा
> मुकेपणाने मरण्यासाठी
> एवढं कसं कळत नाही तुला?
> तू जगत असतेस
> फक्त मरता येत नाही म्हणून !''[१८]

आजही स्त्रीला दबावांखाली जगावे लागते. तिला स्वत:चे अस्तित्व नाही, आत्मभान नाही, वडील पती, मुलगा, समाज, नातेसंबंध, नोकरीचे ठिकाण अशा अनेक प्रकारच्या दबावांखाली तिचा श्वास गुदमरतो. काही जणींचा तर ह्यात मृत्यूसुद्धा होतो. त्यांच्या जगण्यात उमेद नसते, निश्चित ध्येय नसते. असे जगणे कवयित्रीला 'मृता' समान वाटते. म्हणूनच 'मृत' ह्या कवितेत कवयित्री म्हणते,

"ज्यांच्या आयुष्यात
रस्त्यांना वाटा नसतात
ते आज मेले
उद्या मेले
तरी सारखेच असतात
ज्यांचे श्वास
असंख्य अस्तित्वांनी
दाबले जातात
ते श्वास दाबून जगले
तरी मनाने मेलेले असतात."[१९]

किंवा एकटेपणाची वेदना पहा :

"आपण एकटे असतो
घरीदारी उघड्या बाजारी
आपल्या सावलीपासूनसुद्धा"[२०]

'सूर्य' व 'निर्बुध्द' ह्या कवितांमधून शरीरधर्म, शरीरत्वाची जाणीव व्यक्त झाली आहे. शरीरधर्म हा प्रत्येक माणसाला अस्वस्थ करत असतो. स्त्रीपुरुष ह्या दोन्ही जिवांकडून हा शरीरधर्म जेव्हा आत्मीयतेने जोपासला जात नाही,

"तेव्हा माणसे
स्वत:च स्वत:ला कुरवाळून घेतात
कारण कुरवाळणे
ही भूक असते
प्रत्येकाच्या शरीराची
कुरवाळणे ही एक अर्थहीन निर्बुद्ध
प्रक्रिया असली तरी"[२१]

'झिडकारून' ह्या कवितेमध्ये स्वत:च्या मनाचा, शरीराचा भयानक राग व्यक्त करणारी स्त्री पहावयास मिळते. कशी ते पहा :

"मला भयानक राग आहे
स्वत:च्या शरीराचा
जे कधीच माझे असून
मला समजले नाही
मला प्रचंड तिरस्कार आहे या शरीराचा
आणि शरीरातून न सुटणाऱ्या मनाचा"[२२]

स्त्रीच्या हसण्याचे स्वरूप 'ते तसले हासू' ह्या कवितेतून स्त्रीमनातील निराशा 'सरताना' ह्या कवितेतून, तर स्त्रीजीवनाची मर्यादा 'काठाकाठाने' ह्या कवितेतून व्यक्त झाली आहे.

### ३.२.२ कौटुंबिक नातेसंबंधातून येणारे अनुभव :

'स्त्रीसूक्त' (१९८८) ह्या काव्यसंग्रहामधील 'बातम्या', 'तू कोण', 'संध्याकाळ', 'ती एक मिनी कॉम्प्युटर', 'बिन चेहऱ्याची', 'आक्रस', 'आधार', 'वाटणी', 'वाढत्या

वयात', 'दोन मुलांची आई', 'अवलंबिता', 'सुखी संसार' ह्या कवितांमधून कौटुंबिक नातेसंबंधातून येणारे विविध अनुभव व्यक्त झाले आहेत.

'वाटणी' ह्या कवितेतील स्त्री आपल्या तीनही मुलांवर चांगले संस्कार करून त्यांना नोकऱ्या लावते. पण शेवटी मुलांना आईचे ओझे वाटते. काही ना काही कारणे सांगून आईने आपल्याकडे रहायला नको, दुसऱ्याकडे रहावे, अशी त्यांची इच्छा असते. तिच्या त्यागाची, कष्टाची किंमत न करणारी, स्वार्थी नातेसंबंध जपणारी मुले येथे दिसतात. असे असूनही आपण सुखात आहोत, असे भासवणारी आई येथे दिसते. आई ही आईच असते. लेकरांच्यावर ती अखंड प्रेमच करते. आपण फार सुखी आहोत, असे सांगताना तिच्या डोळ्यात पाणी येते. पहा :

> ''ती म्हणे मी तीन मुलांची आई
> मोठी भाग्याची बाई
> नाही मिळाला जमीनजुमला
> पण प्रत्येकाला शिकवला
> आपल्या पायावर उभा केला
> आवडत्या मुलीबरोबर
> संसार थाटून दिला
> सगळेच मला म्हणतात
> आता अमाच्याकडे ये रहायला
> प्रेम त्यांचे इतके तरी
> का गं पाणी तिच्या डोळ्याला?''[२३]

कुटुंबामध्ये स्त्री ही सर्वांच्या हक्कांची असते. परंतु तिचा मात्र कुणावर हक्क नसतो. तिने कधी आचारी पडायचे नसते. नेहमी टवटवीत दिसायचे असते. 'बायको' ह्या कवितेमधून हे वास्तव पुढीलप्रकारे व्यक्त झाले आहे.

"बायकोने नसते
आजारी पडायचे
बायकोने नसते
मित्रांशी बोलायचे
बायकोने नसते
म्हातारे दिसायचे
बायकोने नसते
नवऱ्यापेक्षा उंच व्हायचे
बायकोने असावे
सदा ताजे टवटवीत"[२४]

घरातील सर्वांच्या प्रश्नांना एकाचवेळी उत्तर देणारी, सर्वांच्या ज्या तिच्याकडून अपेक्षा आहेत, त्या पाहून ती म्हणजे एक मिनी कॉम्प्युटरच आहे, असे कवयित्री म्हणते. नवऱ्याचे कपडे, मुलाची वही, मुलांचा अभ्यास करून घेणे, सासुबाईंचे आयोडेक्स, पंचांग सर्व तिने शोधून द्यायचे आहे. अशी ही स्त्री प्रत्येकाची कुणी ना कुणी लागत असते. पण ती कोण आहे ते तिचे तिलाच ठाऊक नाही. 'तू कोण?' ह्या कवितेमध्ये कवयित्री हा विचार पुढीलप्रमाणे व्यक्त करते,

"तू कोण बाई?
मी इकडची जाई
तू कोण बाई?
मी दोन मुलांची आई
तू कोण बाई ?
मी सासूसासऱ्यांची दाई
तू कोण बाई?
माझं मलाच ठाऊक नाही"[२५]

अगदी श्रीमंत स्त्रीचीसुद्धा हीच व्यथा आहे. ही व्यथा 'कॅक्टस' ह्या कवितेमधून व्यक्त झाली आहे. वाढत्या वयात तिच्या लक्षात येते की, ती सोडून प्रत्येकाला घरात स्वत:चे वेगळे जग आहे. जसजसे तिचे वय मोठे होते, तसे तिचे घरातील केंद्रबिंदूचे स्थान नाहीसे होते. प्रत्येक क्षणाला तिने संसार, मुले ह्यांचा विचार केला. ते सर्व नंतर कवडीमोल ठरते. वृद्धापकाळातील स्त्रीचे कुटुंबातील स्थान 'वाढत्या वयात' ह्या कवितेत कवयित्रीने मार्मिकपणे सांगितले आहे ते असे :

"वय वाढत जाते
मन रिते रिते होते
कणाकणाने वेचलेले सारे
कवडीमोलाचे वाटू लागले
वय वाढत जाते
तेव्हा तुटत तोडत जावे
आयुष्यभर जोडलेले
मोडत मोडत जावे."[२६]

मिळवती मुले व वृद्ध आई ह्यांच्या नातेसंबंधाचा विचारकरता, विभक्त कुटुंबपद्धतीत, प्रगत फ्लॅट संस्कृतीत वृद्ध सासुसासऱ्यांना थारा नाही, असे दिसते. जागेच्या अडचणीच्या निमित्ताने ते गावाकडेच आहेत, तेच ठीक. परंतु त्यांच्या घरावर मात्र डोळा. फ्लॅट घेताना तो पैसा उपयोगी पडेल. परंतु सासूसाऱ्यांना सांभाळण्याचे संकट येईल, त्यापेक्षा अडचणीच्या वेळी येणारे व गरज संपताच हकालपट्टी केली, तर जाणारे, असेच नाते चांगले, असे 'आक्रस' ह्या कवितेतील नायिकेला वाटते. उद्या आपणही ह्याच अवस्थेत जाणार आहोत, ह्याचे भान नसणारी स्त्री येथे दिसते. आजच्या स्त्रीच्या स्वभावातील स्वार्थीपणा कवयित्रीने येथे अचूकपणे टिकला आहे कसा तो आता पहा :

"आता आपले बरे आहे
येतात अडीनडी बाळंतपणाला
भांड्याला भांडी वाजू लागली
की निमूट जातात परत गावाला
म्हटले तर आहे म्हटले तर नाही
असे असावे आजकाल नाते
ज्याचे त्याचे आभाळ असते
आपापल्या डोक्यापुरते"[२७]

'दोन मुलांची आई' ह्या कवितेत विधवा आईची मुलांकडून होणारी उपेक्षा व्यक्त झाली आहे. पतीपत्नींनी मुलांची आयुष्ये घडवली. नवऱ्याच्या मृत्यूनंतर ह्या स्त्रीने मुलांना त्यांच्या आयुष्यांच्या अत्युच्य शिखरावर नेऊन बसविले. मुलांनी मात्र आपल्या वृद्ध आईला एकटेपणाचे दु:ख भोगायला लावले आणि कधीमधी एखादी साडी घेऊन आपले कर्तव्य पार पाडणे, अशा स्वरूपात वृद्धांच्या वाट्याला येणारे आजकालचे निष्प्रेम जीवन हृदयाला चटका लावून जाते. म्हणूनच की काय, 'निर्लेप' ह्या शेवटच्या कवितेत कवयित्री म्हणते,

"असून सुद्धा साऱ्यात
नसावे कशातच
असू नये आपले काही
होऊ नये कुणाचे काही
निर्लेप तव्यासारखे संसारात रहावे
सरणावरती काही न उराव"[२८]

स्त्रीने कुटुंबात कसे रहावे, हे उपरोधपूर्ण भाषेत येथे मांडले आहे. 'आधार' या कवीतेतील स्त्री यंत्रासारखी राबणारी, स्वत:लाच हरवून बसणारी, नोकरी व संसाराच्या दोन्ही

स्कूटर्स एकदम चालवणारी अशी आहे. ह्या स्त्रीचे म्हातारपणाचे दु:ख कवयित्रीने उत्कट शब्दामध्ये मांडले आहे. ते अंत:करणावर खोल ठसा उमटवणारे आहे. कसे ते पहा :

''वृद्धपणासाठी देखील
करून ठेवलीस पैशाची तरतूद
मुलांच्याच वाहिल्यास काळज्या चिंता
त्यांनाच दिलास पैशाचा आधार
वृद्धाश्रमात राहिलीस एकाकी
मुलांवर झाली नाहीस कधीच भार''[२९]

आज यंत्रयुगात स्त्री देखील यंत्राधीन झालेली आहे. घरातील अनेक कामे करण्यासाठी मिक्सर, गॅस, फ्रीज, ओव्हन, स्लाईसर ह्यांची तिला सवय झालेली आहे. साधन बिघडल्यामुळे पाहुण्यांचा पाहुणचार करणे तिला अवघड वाटू लागते. शेवटी हॉटेलवर पाहुण्यांचा पाहुणचार करण्याचे ती ठरवते. 'अवलंबिता' ह्या कवितेमधून हे प्रभावीपणे व्यक्त झाले आहे पहा :

''आता कसं करू बाई
मिक्सर बिघडला
जाऊ म्हटलं घेऊन झालं
सगळ्यांना हॉटेलला''[३०]

नोकरी करणाऱ्या स्त्रीची धावपळ 'संध्याकाळ' ह्या कवितेमधून कवयित्रीने मांडली आहे. ऑफिसमधून वेळेआधी निघून घरच्यांसाठी राबणाऱ्या ह्या स्त्रीची घरातील भूमिका काहीशी वेटरचीच असते पहा :

''सहा वाजण्यापूर्वी धावत पळत
घराचे कुलूप उघडायचे असते
मुले नवरा येण्यापूर्वी

पदर खोचून गृहिणी व्हायचे असते
कधी कांदेपोहो, उपमा, शिरा
प्रत्येकाची एक मागणी असते
गरम गरम चहा आणि डिश
तिची भूमिका वेटरची असते.''[३१]

अशी ही स्त्री कोणाची तरी बायको, कोणाची तरी मुलगी, कोणाची तरी आई अशी प्रत्येकाची कोणी ना कोणी लागत असते परंतु ती कोण आहे हे मात्र तिच तिलाच ठाऊक नसते. 'बिनचेहऱ्याची' ह्या कवितेमधील नायिका ही अशी आहे पहा :

''ती शोधते आहे एक चेहरा
तिची तिला ओळख पटवून देणारा''[३२]

## ३.२.३ नोकरी–व्यवसायातून येणारे अनुभव :

'स्त्रीसूक्त' (१९८८) ह्या संग्रहामधून स्त्रीजीवनातील विविध अनुभवाबरोबरच नोकरी-व्यवसायातील अनुभवांचेही दर्शन होते. 'लोकलमधे', 'दिनविशेष', 'यादी', 'गतीची सर्कस', 'सुट्टीचा दिवस', 'तळ्यात मळ्यात', 'शेम ऑन हर', 'देणे', 'फ्लॅटमध्ये', 'काल आणि आज', 'गरजा', 'स्टॅन्डर्ड', 'शंभर वर्षे', 'आधार' इत्यादी कवितांमधून नोकरी-व्यवसायातील अनुभव परिणामकारकपणे व्यक्त झाले आहेत. ह्यामधील स्त्रीजीवन स्त्रीजातीला अस्वस्थ करणारे असून अंत:र्मुख होऊन विचार करावयास लावणारे आहे. 'स्त्रीसूक्त'मधील कविता विशिष्ट मध्यमवर्गीय व नोकरी करणाऱ्या स्त्रीच्या व्यथा-वेदना मांडणाऱ्या दिसतात. 'लोकलमधे' ह्या कवितेत मुंबईसारख्या शहरी भागातील स्त्री नोकरी करताना धक्के खात लोकलमधून प्रवास करते. घरी वेळ मिळत नाही म्हणून ती लोकलमध्ये भाजी निवडते, पेंगतच स्वेटर विणते, नोकरीच्या ठिकाणी वेळेत पोहोचण्यासाठी तिला तिचे

स्त्रीपण विसरायला होते. गर्दीत तिच्या शरीराचा कोणीतरी फायदा घेतो. धक्का देऊन तिलाही त्या धक्क्यांची इतकी सवय झाली आहे की, आता तीही धक्का देतेच नोकरी करून पैसे कमवून घराला आर्थिक सहाय्य करत असली, तरी तिची घरकामातून मात्र सुटका झालेली नाही. संसार व नोकरी सांभाळत असताना तिची किती ओढाताण होते, हे कवयित्रीने मार्मिकपणे व्यक्त केले आहे. स्वत:चे अस्तित्व विसरून ती गृहिणीची भूमिका पार पाडण्याचा आटोकाट प्रयत्न करते. ह्या धावपळीच्या जीवनात आपल्याला एक गाणारे मन होते, हेही तिला आता विसरायला झाले आहे. कसे ते पहा :

''घड्याळ असते तिच्या मनात
क्षणोक्षरी किटकिटणारे
कधीच ती विसरलेली असते.
एक मन होते तिलाही गाणारे''[३३]

'दिन-विशेष' या कवितेमधील स्त्री आपली नोकरी संपली की, घरकामाचे नियोजन करते. ही स्त्री ऑफिसमधील क्लार्क असो, लेक्चरर असो, डॉक्टर असो वा फॅक्टरीत कामाला असो. आपली कामावरून सुट्टी झाली की, लिंबाचे लोणचे घालायचे की सुरळीच्या वड्या करायच्या की कुर्ड्याला गहू भिजवायचे किंवा जेवणात पुरणपोळी करायची, ह्यातच गुंतून पडते. उरला वेळ तर झोप व शेजारणीशी फालतू गप्पा आहेतच. ह्या सर्वांमधून ही स्त्री स्वत:साठी कमी, पण घरच्यांसाठी अधिक जगते. नोकरी-व्यवसाय सांभाळत संसार करण्याची तिची ओढ, धडपड हे तिचे विश्व ह्या कवितेतून मार्मिकपणे व्यक्त झाले आहे. आजच्या स्त्रीचे जीवन ह्याच्याशी तंतोतंत जुळते.

घड्याळाच्या काट्याबरोबर पळणाऱ्या स्त्रीचा दिनविशेष ठरलेला असतो. नोकरीला जाण्यापूर्वी तिची यंत्रासारखी धावपळ 'गतीची सर्कस' ह्या कवितेमध्ये कवयित्रीने रेखाटले आहे. कसे ते पहा :

''तीन मिनिटांत केरवारे
अंघोळ पटपट उरका सारे
पाच मिनिटात पंधरा फुलके
घाईच्यावेळी भाजीला दोडके (नेमके!)
भाताविना जेवण हलके
नेमका मेला गॅस संपून जाय
घर ते स्टेशन मैल चार
सात मिनिटांत होते पार
सकाळच्या अध्यायाचे हेच सार
साडेनऊच्या ठोक्याला व्हिटीवरती उतरली बाय
गतीची सर्कस ठाऊक आहे काय?''[३४]

नोकरी-व्यवसाय करणाऱ्या स्त्रीचा रविवार 'सुट्टीचा दिवस' ह्या कवितेमध्ये कवयित्रीने नेमकेपणाने चित्रित केला आहे. आठवडाभरचे कपडे धुणे, इस्त्री करणे, इडली चटणी नाष्टा करणे, साग्रसंगीत स्वयंपाक करणे, दळण करणे, मंडईतून आठवड्याची भाजी आणणे, असा हा दिवस! पहा :

''रविवारचा दिवस
सहा दिवस मोजीत रहायचा
घरकामानं दमदम दमायचा
सुट्टी म्हणून स्वत:लाच विकायचा''[३५]

सुट्टी दिवशी सुट्टीच उपभोगता येत नाही. नोकरी-व्यवसायामुळे आर्थिक दर्जा उंचावलेली तथाकथित उच्च-मध्यमवर्गीय स्त्री स्वत:चा फ्लॅट घेण्यासाठी दोघांचे आयुष्यभराचे पगार पणाला लावणारी, ह्यातच आयुष्य सार्थ की लागल्याचे समाधान मानणारी, फ्लॅट संस्कृतीत राहणारी अशी स्त्री 'फ्लॅटमधे' ह्या कवितेत चित्रित झालेली आहे. तरंगत्या कुंड्यातील कॅक्टस्‌चे वेड, फॉईग पॅनचा सेट, हॉल चे डेकोरेशन, फ्रीजमध्ये थोडी फार फळे, सरवताच्या बाटल्या, आईस्क्रिमचे कोन, प्रतिष्ठेसाठी टीपॉयवर फोन, सौंदर्यप्रसाधने, ह्यातच बुडून जाणारी, उच्चभ्रू जीवन जगणारी दारबंद फ्लॅट संस्कृतीतील स्त्री समाजापासून अधिक दूर जाते. पहा :

> ''मात्र फ्लॅटचे दार नेहमी बंद असावे
> आपले वेगळेपण डबाबंद जपावे
> दिसलेच कोणी शेजारी पाजारी
> तर घडीदार काटेकोर हसावे''[३६]

'तळ्यात मळ्यात' ह्या कवितेमध्ये इंजेक्शन देणे, लेक्चर देणे, विज्ञानातील डॉक्टरेट मिळवणे, अशी कामे करूनही पारंपारिक काम, पारंपारिक विचार, श्रद्धा ह्यातही ती कशी अडकलेली आहे, ह्याचे सुंदर वर्णन कवयित्रीने केले आहे. पहा :

> ''मूल होण्यासाठी वाट पाहता पाहता
> कोण काय सांगेल ते नवस बोलली
> बुद्धिमत्ता कसोटीला लावून
> तिने आपले लेक्चर चांगलेच गाजवले
> वर्गात शिरता शिरता कपाळावरची टिकली पडली
> म्हणून तासभर तिचे मन चुकचुकत राहिले.''[३७]

ऑफिसमध्ये नोकरी करणारी स्त्री कामातून पळवाट काढण्यासाठी देहप्रदर्शनाचा वापर करते. तिच्या शारीरिक हालचालींचे सूक्ष्म निरीक्षण 'शेम ऑन हर' ह्या कवितेत कवयित्रीने एका तटस्थ दृष्टिकोनातून केले आहे. 'बॉस' ला खुश करण्यासाठी ती काय करते, पहा :

''त्याने तिचे पेपर तपासले
यादी करून गठ्ठे बांधले
गोड हसून 'थँक्यू' म्हणत
तिने 'शेक हँड' चे बक्षीस दिले.''[३८]

हे पाहून पुरूषच ओरडतो , 'शेम ऑन हर' नोकरी करणाऱ्या स्त्रीच्या मनाची घुसमट 'देणे' ह्या कवितेत प्रकर्षाने व्यक्त झाली आहे. ही स्त्री कामाखाली दबली जाते. कामाचा प्रचंड ताण, गतीमान आयुष्य, नोकरीची ताबेदारी, जागेची टंचाई, वाढत्या खर्चाचे राहणीमान, सणवार, पाहुण्यांची सरबाराई, वेळेची काटेकोर बंधने इत्यादी विविध दबावांखाली जगणाऱ्या स्त्रीच्या आयुष्यात रोमँटिक प्रेम, काव्यमता आणि हुळवारपणा ह्यांना स्थानच मिळत नाही. नवरा मात्र रात्री तिला निवांत भोगू शकतो. तिच्यापुढे मात्र अनेक प्रश्नचिन्हे उभी राहतात. पहा :

''देणे दिल्यासारखे ती देते शरीरही
रोजच्या कामाचा एक भाग म्हणून
तेव्हाही तिच्या मनात धावत असते
सात सतावन्नची फास्ट लोकल
गर्दीत पळणारे पाय
अर्धवट निवडलेली भाजी
संपत आलेला गॅस
आणि इतर बरेच काही''[३९]

शिक्षण नोकरी ह्यामुळे आजच्या स्त्रीची जबाबदारीची कामे अधिकच वाढली आहेत. संसार आणि नोकरी सांभाळत असताना होणाऱ्या धावपळीमुळे तिला तिचे 'स्त्रीत्व' विसरून 'माणूस' म्हणून मुक्त जीवन जगता येत नाही, याची खंत 'एकदा तरी' 'काल आणि आज' इत्यादी कवितांमधून तीव्रतेने व्यक्त झाली आहे. शिक्षणामुळे हक्कांची जाणीव झाली. नोकरीमुळे आर्थिक स्वातंत्र्य मिळाले. पण तिच्या दु:खात मात्र अधिकच वाढ झाली. 'काल आणि आज' ह्या कवितेत मात्र हे कवयित्री पुढीलप्रमाणे स्पष्ट करते,

"हक्कासाठी भांडता भांडता
जवळची नाती दुरावत गेली
पैसा हाती आला पण
सुखाची वाटी रिकामीच राहिली
अस्वस्थ मनाची निराधार स्त्री
श्रद्धेच्या टोकावर लोंबकळत राहिली
आपलेच वर्तमान वाचता वाचता
आजचीच दु:खे जडभार झाली."[४०]

स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वत:चे कपडे सौंदर्यप्रसाधने, चपला-सँडल्स, क्रीम, हेअरसेट, डाय, शांपू, नॉयलॉनच्या ब्रा, मॅचिंग पेटीकोटस्, नेलपेन्टस्, लिपस्टिक्स, पावडर्स, आयब्रोज ह्यासाठी हजारो रूपये खर्च करणाऱ्या आणि "देशाचे दरडोई उत्पन्न साठ पैसे , असला कसला हा भिकार देश, बाई?" असे म्हणून नाक मुरडणाऱ्या सो कॉल्ड 'हायब्रो' लेडीजचे चित्रण उपरोधाने 'गरजा' व 'स्टॅन्डर्ड' ह्या कवितांमधून कवयित्रीने केले आहे. उच्चभ्रू जीवन जगणाऱ्या स्त्रीचे चित्रण येथे आले आहे.

अशाप्रकारे 'स्त्रीसूक्त' ह्या कवितासंग्रहामध्ये आलेले नोकरी-व्यवसायातील स्त्रीजीवनाचे चित्रण स्त्री व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडून दाखविणारे आहे. ह्या संदर्भात

प्रा. ना. य. मुदबखे म्हणतात, ''साहित्यातून जीवनाचे वास्तवदर्शन घडावे, अशीही अपेक्षा केली जाते. कवयित्री अश्विनी धोंगडे यांच्या 'स्त्रीसूक्त' काव्यसंग्रहात निश्चित वाचकांस यांचा प्रयत्न येतो, असा हा अस्वस्थ करणारा काव्यसंग्रह आहे.''[४१] आजच्या नोकरी करणाऱ्या महानगरीय स्त्रीचे वास्तवचित्रण कवयित्रीने केले असल्यामुळे प्रा. ना. य मुदबखे ह्यांचे हे मत योग्यच आहे.

### ३.२.४ विवाहसंस्थेतून आलेले अनुभव :

'स्त्रीसूक्त' ह्या संग्रहामधील 'यंत्र', 'विक्री वस्तू', 'छोट्या जाहिराती' इत्यादी कवितांमधून विवाहसंस्थेतून येणारे अनुभव, विशेषत: तिच्या व्यथेचे, दु:खाचे भेदक चित्रण पहावयास मिळते. स्त्री-पुरुष विषमतेमुळे तिच्या वाट्याला हे दु:ख आलेले आहे. म्हणूनच कवयित्रीला ह्या स्त्रीला 'यंत्र' म्हणावेसे वाटते. सतत काम करणारे, न बिघडणारे आणि बिघडले तर चार-दोन धपडांत जागेवर येणारे आदरातिथ्य ह्या तत्त्वावर असणाऱ्या ह्या यंत्राबद्दल 'यंत्र' ह्या कवितेत कवयित्री म्हणजे,

''खर्चसुद्धा फार नाही
रोजच्या जेवणात भागून जाई
पन्नास हजारासहित सालंकृत घरपोच
त्वरा करा
आपली ऑर्डर आजच नोंदवा''[४२]

मुलीच्या लग्नासाठी दिलेली ही जाहिरात म्हणजे एखाद्या वस्तूची जाहिरातच होय. आजच्या विज्ञानयुगातही स्त्रीकडून भरपूर अपेक्षा ठेवल्या जातात, त्याचे प्रत्यंतर येथे येते. स्त्रीसुद्धा एक माणूस आहे, तिला स्वत:चे मन आहे, हेच समाज आज विसरेला आहे. समाजात स्त्रीचे स्थान काय आहे, हे 'छोट्या जाहिराती'मध्ये स्पष्टपणे आलेले आहे.

वधूकडून भरमसाठ अपेक्षा-अटी, उदा. - उंच, देखणी, गोरी, कोवळी, सडपातळ बांध्याची, उच्च पदवीधर, नोकरी करणारी, गरीब, सालस, कामसू आणि विनयशील, एकत्र कुटुंबात सामावून घेणारी, परंतु वरविषयक जाहिरातीत कोणतीही अपेक्षा, अटी नसतात. पहा :

''वर पाहिजे - कोणतीही अट नाही
(फक्त एक पुरुष हवा) प्रौढ, प्रथमवर
सापत्य, विधुर, कोणीही चालेल''[४३]

विवाह संस्थेतील हा विरोधाभास व दाहक वास्तव कवियित्रीने अचूकपणे टिपले आहे. वयात आलेली मुलगी म्हणजे आईवडीलांची मोठी काळजी जन्मापासून तिच्या लग्नाचा खटाटोप सुरूच असतो. स्थळ चांगले मिळावे म्हणूनच पदवीपर्यंतचे शिक्षण, कातडीचा रंग गोरा व्हावा म्हणून पुष्कळ प्रयत्न, विनयशील, प्रेमळ, घरंदाज म्हणून पाहुण्यांसमोर कौतुक करायचे, शिकली सवरली तरी भरमसाठ खर्च करूनच लग्न करावे लागते. 'विक्री वस्तू' ह्या कवितेत कवयित्री हे वास्तव पुढीलप्रमाणे चित्रित करते,

''चार पाच वर्षे खपून खपून
तिला एकदाची हळद लागली
डोक्यावरचे ओझे खांद्यावर आले
कु मधून ती सौच्या घरी आली
दिवसरात्र खटाटोप जन्मापासून केला
पन्नास साठ हजाराचा ऐवज
एक दिवसात उडून गेला.''[४४]

अशा प्रकारे 'यंत्र', 'छोट्या जाहिराती', 'विक्री वस्तू' ह्या कवितांमधून विवाहसंस्थेतून येणारे कटू अनुभव व्यक्त झाले आहेत. साठोत्तरी मराठी कवयित्रींच्या तुलनेत

अश्विनी धोंगडे ह्यांच्या कवितेतून चित्रित झालेले विवाहसंस्थेतील हे अनुभव अधिक वास्तव पातळीवर व्यक्त झाले आहेत, असे म्हणता येते.

### ३.२.५. स्त्री–पुरूष संबंधातून येणारे अनुभव :

स्त्री-पुरुष जीवनातील तुलनात्मक अनुभव 'स्त्रीसूक्त' ह्या कवितासंग्रहातील 'प्रतिबिंब 'शंभर वर्षे', 'सुखी संसार', 'बायको', छोट्या जाहिराती', 'संध्याकाळ' इत्यादी कवितांमधून व्यक्त झाला आहे. अत्यंत कमी शब्दामध्ये स्त्री व पुरुष ह्यांच्यातील असण्या-दिसण्यातील फरक मार्मिकपणे व्यक्त केला आहे. उदा. 'प्रतिबिंब' ही कविता पहा :

''तो आरशात पाहतो तेव्हा
त्याला दिसतो
जसा तो असतो
ती आरशात पाहते तेव्हा
तिला दिसते
जशी ती नसते''[४५]

ह्या कवितेतील भावना अत्यंत तिखट वाटतात. कारण त्या विदारक सत्य सांगून जातात तने कसे असावे, हे तो ठरवणार. त्याला हवे, तसेच तिने वागले पाहिजे. त्याच्या मर्यादेच्या बाहेर तिने जाता कामा नये. त्याच्या डोळ्याच्या धाकातच राहून स्वत:चा चेहरा, व्यक्तिमत्त्वही फेकून दिले पाहिजे, हे सर्व 'सुखी संसार' या कवितेमध्ये पुढीलप्रमाणे आले आहे :

''त्याच्या हाकेच्या अंतरावर
तिची सावली हवी
त्याच्या विचारांचीच छाप
तिच्या बोलण्यावर हवी
संसारसुखाचा हा वसा

तोंड मिटून सप्तपदीत घ्यावा
आपला एक खरा चेहरा
मोडून तोडून फेकून द्यावा''[४६]

आजच्या प्रगतशील विज्ञानयुगातील सन १९८८ ऐवजी १८८८ हे वर्ष लिहिले, तरी फारसा फरक पडणार नाही. कारण शतकाची चूक अजून सुधारलेली नाही, ह्याची कवयित्रीला मनस्वी खंत वाटते. 'शंभर वर्षे' ह्या कवितेत शिक्षण, नोकरी हे सर्व असूनही स्त्रीला पतीच्या मताप्रमाणेच राहावे लागते. काळाच्या प्रवाहात ती बदलली. परंतु त्यांची स्त्रीकडे बघण्याची दृष्टी मात्र बदललेली नाही. तो आहे तिथेच आहे. तो तिला आपल्या बरोबरीने मानत नाही. पहा :

''पळता पळता शंभर मैल पळून झाले
तो मात्र आहे तिथेच आहे. अजून तसाच''[४७]

अतिशय सूक्ष्मपणे स्त्री-पुरूष तुलना येथे दिसून येते. 'अन्वय'मधील 'तू असा', 'जन्म', 'वास्तव' ह्या कवितांमधूनही स्त्रीपुरुष तुलना व्यक्त झाली आहे. 'मी आणि तू' मध्ये स्त्रीपुरुषाची ही तुलना अतिशय खेळकर शैलीत व्यक्त झाली आहे. स्त्री-पुरुष हे दोन जीव निसर्गाने आपले कसब वापरून निर्माण केले. पती-पत्नीच्या नात्याने त्यांना एकत्र बांधले. जगण्यासाठीचा खेळ सुरू होतो. प्रेमाचे, सुखाचे अनुभव घेता घेता राग, द्वेष, तिरस्कार, फसवणूक, मानहानीचे दु:खद अनुभवही येतात. खेळ कधी मांडला जातो, कधी मोडला जातो. जीवनाच्या ह्या खेळात कवितेच्या शेवटी कवयित्री म्हणते,

''खेळ संपता संपता
एक मात्र कळून चुकले
हार जितीचा सवालच नसतो
खेळ फक्त खेळच असतो''[४८]

### ३.२.६. स्त्रीमुक्ती चळवळ व स्त्रीवाद ह्या अनुषंगाने आलेले अनुभव :

इ.स. १९७५ हे साल आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून जाहीर झाले. त्यामुळे स्त्रीयांच्या, विशेषकरून तिसऱ्या जगातील, विकसनशील देशातील महिलांच्या परिस्थितीवर प्रकाश पडला आणि जे दारुण सत्य बाहेर आले त्यावरून पुढील १० वर्षात महिलांच्या परिस्थितीत सुधारणा व्हावी, ह्या उद्देशाने १९७५ ते १९८५ हे दशक आंतरराष्ट्रीय महिला दशक म्हणून जाहीर केले गेले. ह्या सर्वांचा परिणाम म्हणजे स्त्रीमुक्ती चळवळ ही होय. स्त्रीवादी विचाराला जगभर चालना मिळाली. स्त्रीमुक्ती चळवळीतील विचारांची व भावनांची लाट सर्व जगभर पसरली. भारतामध्येही तिचा खोलवर परिणाम झाला. परंतु ह्या दरम्यान स्त्रीमुक्ती चळवळ म्हणजे काही मूठभर स्त्रियांनी चालविलेली पुरुषविरोधी चळवळ, असा काहीसा समज होता. त्यावेळी भारतीयांना आपल्याकडे स्त्रीमुक्तीची गरज नाही, असे वाटत होते. पाश्चात्य संस्कृतीतील अनेक वेड भारतात आले, तसेच हे एक खूळ येत आहे, अशी त्यांची समजूत झाली. प्रारंभीच्या काळात स्त्रीमुक्ती चळवळीत काम करणाऱ्या स्त्रियांना लोकांच्या आक्षेपांना तोंड द्यावे लागले.

शोषणाच्या विरोधात संघटित होण्यास भारतीय स्त्रियांनी सुरुवात केली. भारतीय स्त्री पाश्चात्य स्त्रीच्या तुलनेत खूपच मागे होती. तिच्यावर परंपरेची, समाजाची, कुटुंबाची अनेक बंधने होती ही बंधने झुगारून आपणही स्वतंत्र व्हावे, असे तिला वाटत होते. संधी मिळाल्यास आपणही पुरुषांची बरोबर करू शकू, अशी तिची जाणीव वाढत गेली. स्त्रियांची ही आंतरिक घुसमट बाहेर आली. यातूनच स्त्रीमुक्ती चळवळ उभी राहिली. स्त्रीमुक्ती चळवळ म्हणजे स्त्रियांनी स्त्रियांसाठी चालवलेली चळवळ नव्हे, तर मानवमुक्तीच्या चळवळीतील तो एक प्रवाह आहे. जात, धर्म व वर्ण ह्यांना भेदून सर्वांना सामावून घेऊन संघटित ताकद निर्माण

व्हावी, असे ह्या चळवळीला वाटते. स्त्रीमुक्ती चळवळ समाजाच्या गरजेतून निर्माण झाली आणि भारतीयांच्या स्थानिक विशिष्ट प्रश्नांना ह्या चळवळीने हात घातला. अश्विनी धोंगडे ह्यांच्या मते, ''समाजजीवन बदलामुळे, विज्ञानाच्या प्रगतीमुळे, शिक्षणाने मिळालेला आत्मविश्वास यामुळे आपल्या दुबळ्या, पराधीन आयुष्याची जाणीव होत होत तीन दशकात स्त्रिया आपला आवाज उंचावू लागल्या आहेत. स्त्रियांच्या स्वातंत्र्य आणि समानतेचे लढे छोट्या स्वरुपात गेल्या शतकातच सुरू झाले असले, तरी अजूनही संघटितपणे स्त्रीवादी चळवळींना विश्वव्यापी रूप धारण केले असे खणखणीत, ठामपणे म्हणता येत नाही. परंतु असंतोषाची ठिणगी तर पेटली आहे म्हणून भडका उडेल, अशी आशा करायला हरकत नसते.''[४९] ही अश्विनी धोंगडे ह्यांची आशावादी भूमिका स्त्रीमुक्ती चळवळीची मर्यादा व्यक्त करते. तिचे क्षेत्र लक्षात येते. ह्या चळवळीने सर्व समाजाला घेऊन काम करावयास हवे असे वाटते. ह्याविषयी गीता साने ह्यांचे पुढील मत जाणून घेण्यासारखे आहे, ''सुशिक्षित स्त्रीने अशिक्षित व मागासलेल्या स्त्रियांना मदतीचा हात पुढे करावा, हे ह्या दृष्टीने उपकारक आहे. कारण आपल्या समाजात स्त्रियांना जात, वर्ण, वर्ग इ. उपाधी नसून त्या केवळ दास आहेत. अनोळखी प्रदेशात हिंडताना शिक्षण, विद्वत्ता, अधिकार, प्रतिष्ठा ही स्त्रीची सारी कवचे गळून पडतात आणि ती उरते केवळ एक 'स्त्री'. या अवस्थेतून मुक्त होण्यासाठी सर्व स्त्रियांनी स्वातंत्र्याबरोबरच सुशिक्षित स्त्रीला 'माणूसपण' मिळवायचे आहे. स्त्रीस्वातंत्र्याची चळवळ जिवंत व दीर्घ कालावधीची आहे. डोंगरमाथ्यावर पडलेल्या पाण्याला दिशा असते. आखलेला मार्ग नसतो. तसेच जिवंत चळवळींना दिशा असते.''[५०] स्त्रीमुक्ती चळवळ ही स्त्रीवादी साहित्याच्या निर्मितीला कारणीभूत ठरली. अश्विनी धोंगडे त्यांच्या कवितेतील स्त्रीवाद, स्त्रीवादी जाणिवा-विचार ह्यांचा अभ्यास करण्यापूर्वी स्त्रीवाद, स्त्रीवादी साहित्य म्हणजे काय, हे समजून घेणे आवश्यक आहे.

स्त्रीवाद हा परिपूर्ण व स्वयंभू नाही. हा वाद कोणा एका स्त्रीने लिहिला नसून तो उत्स्फूर्त आहे. एकाच वेळेला जगात अनेक ठिकाणी हा विचार अस्तित्वात आला. लिंडा गार्डन ह्यांच्या मते, ''स्त्रियांचे दुय्यमत्त्व आणि त्यासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षाचे विश्लेषण म्हणजे स्त्रीवाद होय. याचाच अर्थ असा की, समाज व्यवस्थेतील स्त्रियांचे दुय्यमत्त्व व त्यांना माणूसपणाच्या हक्कांसाठी करावा लागणारा संघर्ष यावर स्त्रीवादाने प्रकाश टाकलेला आहे. व्यक्तिस्वातंत्र्य, आत्मशोध, आत्मभान, अस्मिता, समता, हक्क, कर्तव्य व अधिकार या जाणिवातून स्त्रियांनी अपल्या हक्कांसाठी अस्मितापूर्ण लढा दिला. जातिभेद, धर्मभेद व वर्णभेदाच्या पलीकडे जाऊन स्त्रियांच्या हक्कांसाठी समतामूलक स्त्री पुरुषांनी दिलेला आत्मभानाचा अस्मितापूर्ण लढा म्हणजे 'स्त्रीवाद' होय.''[५१] थोडक्यात, स्त्रीवाद म्हणजे स्त्रीला आपल्या स्वत्वाची जाणीव होणे, तिला आपल्या व्यक्तीमत्त्वाचा अर्थ कळणे, तिला तिच्या अस्मितेचा सार्थ अभिमान वाटणे, तिला तिच्या माणूसपणाबद्दल आत्मियता वाटणे, तिला तिचे हक्क, अधिकार कळणे, तिला तिच्या अवमूल्यनाची आणि शोषणाची जाणीव होणे, तिने आपल्या दडपल्या जाणाऱ्या स्वत्वासाठी संघर्षप्रवण होणे. ह्यासंदर्भात अश्विनी धोंगडे म्हणतात, 'स्त्रीवाद म्हणजे पुरुषापासून फारकत घेऊन स्वतःचा सुभा निर्माण करणे नव्हे. पण संस्कृतीच्या हजारो वर्षांच्या इतिहासाने बाईचे मानवपण नाकारून तिला जी पशुतुल्य अवस्था प्राप्त करून दिली, त्यातून बाहेर पडून आपले हक्क प्रस्थापित करून घेण्यासाठी निर्माण केलेले हे व्यासपीठ आहे. ज्यावेळी स्त्री ही खुलेपणाने श्वास घेऊन पुरुषाइतकेच स्वतंत्र जीवन जगू शकेल, त्यावेळी स्त्रीवादाची गरज भासणार नाही. परंपरेची ही पुटे स्त्री-पुरुषांवर इतकी घट्ट बसली आहेत की, हा लढा जिंकण्यासाठी हजारो वर्षे जावी लागतील. आणि कदाचित स्त्री पुरुषांनी त्यावेळी मानवतावादासाठी लढावे लागेल.''[५२] अश्विनी धोंगडे ह्यांचे हे मत योग्यच आहे.

अर्थातच स्त्रीवाद म्हणजे स्त्रियांच्या इतिहासातील एक नवा आशय, एक नवा विचार, एक नवी दृष्टी, एक नवे स्वप्न, एक नवी दिशा होय. शारदा साठे ह्यासंदर्भात म्हणतात, ''स्त्रीवाद एक बैठक आहे. मानवमुक्तीच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. स्त्रीवाद म्हणजे स्त्री पुरुष समानतेचा आविष्कार घडविण्यासाठी मार्गदर्शन करणारे, किंबहुना मदतकारक ठरणारे एक विचारसूत्र आहे.''[५३]

स्त्रीवादी साहित्याचा विचार करताना 'स्त्रीवादी साहित्य' म्हणजे नेमके काय, हे पहाणे आवश्यक आहे. स्त्री ही स्त्री आहे, म्हणून स्त्रीवादी होऊ शकत नाही. स्त्रियांनी लिहिलेली स्त्रियांची पुस्तके ही स्त्रीवादी होऊ शकत नाहीत. तसेच स्त्रियांनी स्त्रियांवर लिहिलेली पुस्तके म्हणूनही ती स्त्रीवादी ठरत नाहीत. कारण त्यातून पुरुषप्रधान संस्कृतीला आव्हान दिलेले असतेच असे नाही. त्यासंदर्भात अश्विनी धोंगडे म्हणतात, ''जाणीव-जागृती हा या स्त्रीचळवळींचा मुख्य आधार असल्याने अशा 'खास' अनुभवांना आविष्कृत करणारे साहित्य हे स्त्रीवादी साहित्य होय.''[५४] थोडक्यात, स्त्रीसाहित्याची वाङ्मयीन परंपरा जपणारे साहित्य स्त्रीवादी साहित्य होऊ शकत नाही. 'स्त्रीवादी विचार, स्त्रिचा म्हणून खास अनुभव असलेले स्त्रीविशिष्ट जाणिवांचे नवनिर्माण करणारे ज्वलंत लेखन म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय. स्त्री-पुरुष नातेसंबंध, त्यांची मानसिकता, गुंतागुंत, मानवी मनाचे, ताण-तणाव, स्त्री-पुरुष या घटकांमधील संघर्षाचे विश्लेषण, स्त्रीचे दमन व शोषण व्यक्त करणारे लेखन म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय. भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळ अशा काळात बदलत गेलेली स्त्री-पुरुषांची मानसिकता ज्या साहित्यात समर्थपणे व्यक्त होते, त्या साहित्यास स्त्रीवादी साहित्य म्हणावे. सध्याच्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत माणसाच्या मनाला येणारी अस्वस्थता, विमनस्कता व या विमनस्क अवस्थेतून निर्माण होणारी उद्याची आशा यांचे

अजब रसायन स्त्रीवादी साहित्यातून व्यक्त झाले.''[५५] अश्विनी धोंगडे ह्यांच्या कवितेतून हा विचार कशा पद्धतीने व्यक्त झाला आहे, ते आता आपण पाहू.

पूर्णपणे स्त्रीवादी भूमिका घेऊन स्त्रीचे चित्रण करणाऱ्या अश्विनी धोंगडे ह्यांच्या 'स्त्रीसूक्त' व 'अन्वय' ह्या दोन्ही कवितासंग्रहांमधून ठामपणे स्त्रीवादी जाणिवा, स्त्रीवादी विचार व्यक्त झाले आहेत. त्यांनी स्त्रीच्या जागृतीचा विचार आपल्या कवितांमधून स्पष्टपणे, खंबीरपणे व समग्रतेने मांडला आहे. स्त्रीत्वाचे अडसर दूर करून माणूसपणाचा हक्क मिळवणारी स्त्री त्यांच्या काव्यातून दिसते. स्त्रीची लुबाडणूक होणे, तिचा उपभोग घेणे हे अनेक पातळ्यांवरून होत आहे. कोणी तिला नजरेने चाटतो, कुणी चर्चेमधून सहवाससुख मिळवतो. जीवनाच्या ह्या धावपळीत आपण आपले सुख गमावतो आहोत, हे धोंगडे ह्यांच्या कवितेतील स्त्रीला कळू लागले आहे. त्यांच्या कवितेतील स्त्रीजीवनाच्या अवमूल्यनाबद्दलचे काही उद्‌गार मनाला अस्वस्थ करणारे आहेत. 'स्त्रीसूक्त'तातील 'बलात्कार' ह्या कवितेत त्या म्हणतात,

''कुणी कसे कुणी कसे
तिला मोडत तोडत गेले
स्वत:साठी तिच्यापाशी
एक कलेवर उरले''[५६]

त्यांच्या 'विमुक्ता' ह्या कवितेतील स्त्री स्वत:शी झगडता-झगडता स्वत:तून वाढते व श्वास गुदमरलेल्या अनेक स्त्रियांचे श्वास मुक्त करणारी विमुक्ता होते. पहा :

''स्वत:शी झगडता झगडता
ती स्वत:तून वाढत गेली
श्वास गुदरमरलेल्या हजारो स्त्रियांचा
ती एक मुक्त श्वास झाली''[५७]

आजची नोकरी-व्यवसाय करणारी आधुनिक स्त्री अनेकांचा आधार बनली. लग्नापूर्वी शिकून ती नोकरी मिळवते. लहान भावंडांचे शिक्षण, आई वडिलांची सेवा, संसारातील मुले व पती ह्यांचा भार पेलणारी स्त्री वृद्धापकाळातही कोणाचा भार बनली नाही. स्त्रीचा म्हणून 'खास' अनुभव कवयित्रीने 'आधार' ह्या कवितेमध्ये मांडला आहे. स्त्रीजागृतीविचार कवयित्रीने उपदेशपर शैलीत 'दिल्या घरी तू' ह्या कवितेत प्रभावीपणे प्रकट केला आहे. पहा:

> ''रहा रोवून आपले पाय
> निसटत्या वाळूवरही घट्ट रोवून
> तुसुद्धा आहेस पुरूषाइतकीच महत्त्वाची स्त्री
> हे एकदा साऱ्या जगाला दे सिद्ध करून''[५८]

पुरुषप्रधान संस्कृतीला आव्हान देणारी, 'माणूस' म्हणून जगण्यासाठी धडपडणारी अश्विनी धोंगडे ह्यांची स्त्री 'एकदा तरी' ह्या कवितेतून आपल्यासमोर कशी येते पहा :

> ''एकदा तरी तिला जगायचे आहे
> मोकळ्या श्वासाने माणूस म्हणून''[५९]

स्वत्वाच्या जाणीव-जागृतीचे विचार 'स्वत:साठी' ह्या कवितेत पुढीलप्रमाणे पहावयास मिळतात.

> ''कशासाठी कोणासाठी
> एक क्षण झुगारून सारे
> स्वत:साठी जगण्यासाठी''[६०]

स्वत:च्या अस्तित्वाची परिपूर्ण ओळख झालेली जाणीव झालेली जागृत झालेली स्त्रीवादी भूमिका घेणारी अश्विनी धोंगडे ह्यांची स्त्री 'ओळख' ह्या कवितेमध्ये पुढीलप्रमाणे अवतरली आहे,

"ना विसरले मी स्वत:ला
शरणागत वा झाले नाही
माझी पटता ओळख मजला
मित्र झाल्या दिशा दाही"[६१]

आपले घरातील स्थान मध्यबिंदूचे असले, तरी आपले कोणीच नाहीत, ह्याची जाणीव तिला झाली आहे. अश्विनी धोंगड्यांची कविता स्त्रीच्या मर्यादा सांगते, त्याचबरोबर तिचे सामर्थ्यही सांगते पहा :

"एक कोपरा राखून ठेव
स्वत:चा स्वत:साठी
बऱ्या होत नसतात कधीच
वेदनेच्या जन्मगाठी"[६२]

अश्विनी धोंगडे यांच्या 'अन्वय' ह्या कवितासंग्रहातील पहिलीच कविता 'धन्यो स्त्रीजन्म' ही असून तिच्यातून स्त्रीचे दु:ख, दमन व शोषण व्यक्त झाले आहे हे स्त्रीवादी भाष्य 'ओवी' ह्या रचना प्रकारातून अभिव्यक्त झाले आहे. स्त्रीचे दु:ख म्हणजे सरणाविना जळणे, पाण्याविना बुडणे. भाषेनेही मुके असणारा हा स्त्रीजन्म अस्पृश्यांपेक्षाही जास्त वेदनामय आहे. स्त्रीमनाचे दमन, शोषण, 'आतबाहेर', 'झोपडे', 'मृत', 'मी', 'दु:ख', 'सुसंस्कृत' ह्यासारख्या कवितांमधून वास्तव पातळीवर व्यक्त झाले आहे. 'व्यवहार' ह्या कवितेमधील स्त्रीमनाची घुसमट अस्वस्थ करणारी आहे. पहा :

"जेव्हा कढ ओतू गेले बंधने ओलांडून
तेव्हा रक्तपापणी घेतली फक्त मिटून"[६३]

स्त्री-पुरुष नातेसंबंध, त्यांची मानसिकता, गुंतागुंत, मानवी मनाचे ताण-तणाव हे सर्व व्यक्त करणाऱ्या कविता 'तू असा!' , 'जन्म', 'मी आणि तू' आहेत. पैकी 'मी आणि तू' ह्या कवितेतील पुढील काव्यपंक्ती पहा :

''मी आणि तू
दोघांचा हुतुतू
कधी ठाकलो समोरासमोर
भिडवली नजरेला नजर
रेषेआत आल्यावर
बाहुपाशात पकडून ठेवले
श्वास पुरा होण्याआधीच
एकमेका चीत केले.''[६४]

कोणत्याही माणसाचे ह्या जगात येणे व जाणे हे त्याच्या हातात नसते, परंतु त्याचे कर्तृत्व मात्र त्याच्याच हातात असते. स्त्रीही ह्याला अपवाद नाही.

'असे मला' ह्या कवितेतून ते असे व्यक्त झाले आहे. पहा :

''माझे इथे असणे नसणे
कोण आधीच ठरवून गेले
पण तसे मला एक मन मिळाले
फक्त माझ्या चालीने चालणारे
एक मीपण मिळाले
माझ्याच हाताने घडणारे !
एक प्रतिभेचे एवढेसे पीस
कुंपणापलीकडे उडणारे
विचारांचे एक धगधगते हृदय
कोणतेही आक्रमण थोपवणारे''[६५]

थोडक्यात, अश्विनी धोंगडे ह्यांच्या 'स्त्रीसूक्त' व 'अन्वय' ह्या दोन कवितासंग्रहांमधील समग्र कवितेतून एकसंघ खंबीर अशी स्त्रीवादी भूमिका प्रगट होताना दिसते. 'सखी' सारखी कविता समस्त स्त्री जातीच्या मासिक पाळीचा वैयक्तिक अनुभव आपल्यासमोर घेऊन येते. स्त्रीवादी कवयित्रींच अशी कविता लिहू शकते.

### ३.२.७ महानगरीय संवेदना :

आधुनिक मनुष्यसंस्कृतीचा एक भाग म्हणजे महानगरीय जीवन होय. सर्वांगाने आधुनिक जीवन महानगरात जगणे शक्य होत नाही. कारण समाजात एकाच वेळी जुन्या परंपरा आणि आधुनिकता जवळपास नांदत असतात तेथे आधुनिकतेचे संवेदन स्वाभाविकपणे परंपरेच्या संदर्भात होत राहते आणि परंपरेचे भानही आधुनिकतेच्या पार्श्वभूमीवर घडत जाते. आपला समाज ह्या प्रकारच्या दोन संदर्भात जगत असल्यामुळे आपले महानगरीय संवेदन द्विधा संदर्भात विशिष्ट रूप प्राप्त करून घेते. विकसनशील अशा आपल्यासारख्या समाजातील महानगरीय संस्कृती व तिचे संवेदन ह्या दोन्ही गोष्टी स्थिर नसून परिवर्तनशील असतात. महानगरीय संस्कृती संबंधाचे अनुभव व अर्थपूर्णता पिढ्यानपिढ्यातून बदलत जातात. एक सामाजिक वास्तव म्हणून महानगरीय वास्तव टाळू शकत नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. साठोत्तरी मराठी कवयित्रींच्या कवितेत प्रामुख्याने मलिका अमर शेख, सुनंदा भोसेकर, अंजली कीर्तने, नीरजा, अरुणा ढेरे, अंजली कुलकर्णी व अश्विनी धोंगडे ह्या कवयित्रींनी महानगरीय जाणिवा आपल्या कवितांमधून व्यक्त केल्या आहेत. येथे आपण फक्त अश्विनी धोंगडे ह्यांच्या कवितेतील महानगरीय संवेदना अभ्यासणार आहोत.

कवयित्री स्वत: शहरामध्ये लहानाची मोठी झाली. ती सुशिक्षित, नोकरी करणारी, मध्यम आर्थिक परिस्थितीतील आजची एक आधुनिक स्त्री आहे. तिने आपल्या

सभोवतालच्या सामाजिक वास्तवाला आपल्या काव्यात सूक्ष्मपणे टिपले आहे. तिचे मन जागृत व संवेदनशील असल्यामुळे तिच्या कवितेत महानगरीय जाणिव व्यक्त होणे साहजिकच आहे. तिच्या कवितेत साकार झालेली स्त्री ही शहरी संस्कृतीत वाढलेली, नोकरी-व्यवसाय करीत असलेली अशी आहे. महानगरीय जीवन हा मोठा पट तिच्या कवितेत आलेला आहे. 'स्त्रीसूक्त' मधील 'स्त्री', 'लोकलमध्ये', 'दिनविशेष', 'कॅक्टस', 'गतीची सर्कस', 'फ्लॅटमध्ये', 'देणे' इत्यादी कवितांमधून नोकरी करणारी महानगरीय स्त्री आविष्कृत झाली आहे. पैकी 'स्त्री' ह्या कवितेत शहरामध्ये बसमधून, लोकलमधून प्रवास करताना गर्दीचा फायदा घेणारे लंपट पुरुष स्त्रीचा गैरफायदा घेतानाि दसता. 'लोकलमध्ये' गर्दी तिच्या अंगावरून जाते ती तिचे स्त्रीपण विसरते. कधी धक्के खाते, तर कधी चार देतेही. महानगरामधील दाट लोकवस्तीमुळे स्टेशनवर लोकलमध्ये भरपूर गर्दी असते.

> ''लोकलमध्ये शिरताना
> पाण्यासारखी रेटली जाते
> उभ्या उभ्या पेंगते
> कधी स्टेशन येते
> तिचे तिलाच कळत नाही''[६६]

महानगरीय स्त्री ही ऑफिस, कॉलेज, दवाखाना, फॅक्टरी अशा विविध ठिकाणी नोकरी-व्यवसाय करताना आढळते. त्यामुळे तिचा आठवड्याचा दिनविशेष ठरलेला असतो. 'कॅक्टस' ह्या कवितेमध्ये शहरामध्ये नोकरी करणाऱ्या नवऱ्याच्या अमाप पैशामुळे शहरी स्त्रीचे राहणीमाण उंचावलेले आहे. इंग्रजी-मराठी मिक्स्ड कॉकटेल, जोडीला ड्रिंक्स पार्टी, बॉन्साय, नर्सरी, श्वान प्रदर्शन, आर्ट गॅलरी क्लब रोटरी असे तिचे छंद वाढत गेले. महानगरीय स्त्रीचे हे बदलते रूप डोके सुन्न करणारे असेच आहे. जागेच्या टंचाईमुळे दारबंद फ्लॅट

संस्कृती शहरामध्ये वाढत आहे. ह्यामुळे मानवी मूल्ये नष्ट होत आहेत. माणसामधील जिव्हाळा, प्रेम, आपुलकी, आत्मीयता कमी होत चालली आहे. महानगरीय जीवनातील हे भयाण वास्तव अंतर्मुख होऊन विचार करावयास लावणारे आहे. महानगरीय जीवन हे अतिशय गतिमान झाले आहे. नोकरी करणाऱ्या स्त्रीची ओढाताण, धावपळ 'गतीची सर्कस' ह्या कवितेमध्ये पहा :

''घर ते स्टेशन मैल चार
सात मिनिटांत होते पार
साडेनऊच्या ठोक्याला व्हिटीवरती उतरली बाय
गतीची सर्कस ठाऊक आहे काय?''[६७]

प्रचंड वेगाने बदलत चाललेल्या मुंबईसारख्या महानगरामध्ये पुरुषांबरोबरीने स्त्रीचे आयुष्यही फरफटत चालले आहे. प्रेम, श्रद्धा, समर्पण, रोमँटिकपणा हे शब्द सुद्धा रोजच्या जीवनात हास्यास्पद ठरावेत, इतके स्त्रीजीवनाचे यांत्रिकीकरण झाले आहे. हुंडा, बलात्कार, हुंडाबळी असल्या वाईट प्रथांमध्ये स्त्री बळी जात आहे. तिच्या जीवनातील असुरक्षिता वाढत चालली आहे. स्वत:चे अस्तित्व प्रस्थापित करण्यासाठी विचारवंत स्त्रीलाही कुटुंबाशी झगडा करून प्रसंगी आपला आत्मसन्मान जपावा लागत आहे.

भयावह शहरी वस्तीत गलिच्छपणा, प्रदूषण ह्या गोष्टी भयानक रूप धारण करत आहेत. भरपूर लोक शहराकडे धाव घेत आहेत. त्यामुळे शहरामध्ये संध्याकाळी सर्वत्र गर्दी जाणवते. कवयित्रीने ही सामाजिक महानगरीय संवेदना 'अन्वय' ह्या कवितासंग्रहात पुढीलप्रमाणे व्यक्त केली आहे.

''ओथंबून वाहणाऱ्या संध्याकाळच्या
थबथबत्या गर्दीत
माझीही स्कूटर वाहत आहे

धबकत थेंबा थेंबाने
पुलाखालच्या नदीवर
साचून आली आहेत पाणझाडे
आणि त्यावर वळवळताहेत
असंख्य जीवजंतू''[६८]

शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे माणसाचे अवमूल्यन झाल्याचे चित्रण 'गर्दी' ह्या कवितेत प्रभावीपणे कवयित्रीने केले आहे. पहा :

''गर्दी
माणसांची स्टेशनबाहेर आणि आत
कचऱ्यासारखी
गर्दी
मेंढरांची बसमध्ये आणि लोकलमध्ये
तुडुंब गटासारासारखी
गर्दी
मुग्यांची, झोपडपट्टीत रस्त्यावर
काँग्रेस गवतासारखी''[६९]

महानगरीय दाट लोकवस्तीमुळे माणसाचे जीवन हे कचरा, मेंढरे, मुंग्या ह्यांच्याप्रमाणे झाले आहे, ही खंत कवयित्रीने येथे व्यक्त केले आहे.

### ३.२.८ सामाजिक जाणीव :

सामाजिक जाणिवांचे भान अश्विनी धोंगडे ह्यांना आहे. त्यांच्या कवितेतील सामाजिक जाणिवेला आज एक नवीन परिमाण लाभले आहे. सामाजिक परिस्थितीच्या विशिष्ट छाया व्यक्तीच्या वैयक्तीक जीवनावरही पसरलेल्या असतात. त्याप्रमाणे कवयित्रीचे व्यक्तिगत जीवनविषयीचे चिंतन तिच्या कवितेतून प्रगट होत असताना ते काही सामाजिक

आशय घेऊनच प्रगट होत असते, ''अश्विनी धोंगडे ह्यांच्या कवितेतून अवतीभवतीच्या सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणाला साद आणि प्रतिसाद देणारी संवेदनशीलताही दिसून येते ही कविता कधी कधी समाजात दिसणाऱ्या, घडणाऱ्या किंवा रूढ विचारवर्तनातून प्रकटणाऱ्या घटनाविचारांची झटपट प्रतिक्रिया व्यक्त करतात. वैचारिक टीका-टिप्पणी करण्याचाही तिचा प्रयत्न प्राधान्याने दिसून येतो.''[७०] हे रा. ग. जाधवांचे मत स्वीकारार्ह असेच आहे.

सामाजिक संबंधांच्या संदर्भात एक मुद्दा उपस्थित होता तो स्त्रीपुरूष संबंधाचा, पुरुषाचे चित्रण कवितेतून करताना कवयित्रीने त्यांच्याकडून स्त्रीचे एक माणूस आणि समाजाचा घटक ह्या नात्याने कसे शोषण होत आहे, ह्याचे चित्रण केले आहे. असा अश्विनी धोंगडे ह्यांच्या कवितेबद्दलचा शिरीष पै ह्यांचा अभिप्राय उल्लेखनीय व समर्पक असाच आहे. ''परंतु ज्या ठिकाणी पुरुषाचे चित्रण कवितेतून अतिशय व्यक्तिगत अनुभूतींच्या संदर्भात केले आहे, त्या ठिकाणी स्त्रीच्या पुरुषाशी असलेल्या नात्याकडे कवयित्री कोणत्या दृष्टिकोनातून पहाते ते तपासावयास हवे, ही पै शिरीष यांची भूमिकाही लक्षणीय वाटते, योग्य वाटते.''[७१]

'बलात्कार', 'बातम्या' , 'स्त्रीमुक्ती', 'रुपकंवर', 'विटंबना', 'प्रसिद्धी', 'दोन मुलांची आई', 'छोट्या जाहिराती', 'त्यानंतर', 'फ्लॅटमध्ये', 'धुंदी', 'तळ्यात मळ्यात', 'नकोबाई', 'प्रतिबिंब', 'स्वस्त', 'काल आणि आज', 'शेम ऑन हर', 'सुखी संसार', 'सुरक्षितता', 'विक्री वस्तू', 'वहिवाट' इत्यादी 'स्त्रीसूक्त' ह्या कवितासंग्रहामधील कवितांमधून समाजातील वास्तव टिपण्याचा प्रयत्न कवयित्रीने एका तटस्थ वृत्तीने केलेला आहे, असे दिसून येते.

समाजातील सामाजिक शोषण हे एका वेगळ्या पद्धतीने चालू असते, तर दुसऱ्या बाजूला व्यक्तिगत जीवनात प्रत्येक व्यक्ती ही एकमेकाला कोणत्या ना कोणत्या प्रकारे छळत

असते. एकमेकाला क्लेश देत असते. ह्या पार्श्वभूमीवर स्त्रीची लुबाडणूक ही समाजातील सर्वच क्षेत्रांमध्ये राजरोसपणे केली जाते, हे 'स्त्रीसूक्त' ह्या कवितासंग्रहामधील 'स्त्री', 'गृहिणी', 'बलात्कार', 'रूपकंवर', 'विटंबना', 'छोट्या जाहिराती', 'अवलंबिता' ह्या कवितामधून कवयित्रीने प्रभावीपणे स्पष्ट केले आहे. त्यातून व्यक्त झालेली सामाजिक जाणीव महत्त्वाची आहे. पहा :

''तिचा मूड असो नसो
सारे तिला गृहीत धरतात
लहान थोर सर्वच जण
तिला उपभोगून घेतात''[७३]

किंवा

''टिचभर हुंड्यासाठी कुणी
अग्नी ठेवलाय तिच्या पदरावर
कुणी कातरलेत तिचे पंख
शरीराच्या मोबदल्यात
कुणी नख लावलय तिच्या प्रेमभावनांना
उधळू नयेत म्हणून सहस्त्रकारंजी''[७४]

घरापासून दूर झालेल्या स्त्रीच्या एकटेपणाचे दु:ख तसेच विवाहोत्तर दु:ख 'त्यानंतर' ह्या कवितेमध्ये; विधवा स्त्रीचे दु:ख 'दोन मुलांची आई' हा कवितेमध्ये समाजातील स्त्रीचे स्थान 'स्वस्त' ह्या कवितेमध्ये; तर 'धुंदी' व 'वहिवाट' ह्यासारख्या कवितामधून समाजातील पारंपरिक विचारांचा पगडा असलेली स्त्री ह्यांचे दर्शन घडते.

'या नव्या सुंदर जगात', 'जीवजंतू', 'गर्दी', 'आसपास', 'हुतात्मा स्मारक', 'सरकारी', 'जुनी मोड', 'स्थितप्रज्ञ आपण सारेच', 'स्वतंत्र', 'थोडे', 'कॅसेट', 'मृत्यू' इत्यादी कवितांमधूनही सामाजिक आशय व्यक्त झालेला आहे. 'मृत्यू' या कवितेत मृत्यू केव्हा येईल हे कोणालाही माहित नसते मात्र आपण त्याच्या जवळ-जवळ जात असतो हे

वास्तव कवयित्रीने सांगितले आहे. 'कॅसेट' या कवितेमध्ये जीवनविषयक चिंतन आलेले आहे. जीवन म्हणजे एक कॅसेट पण या कॅसेटमध्ये रिवाईंड करायची सोयच नाही. फास्ट फॉरवर्ड करण्याची सोय आहे परंतु भविष्यांची अनामिक भिती आहे. पहा :

''फास्ट फॉरवर्ड
हो त्यांची सोय आहे
पण प्रचंड भीती आहे
सुरांच्या ओठावर
गाणं केव्हा संपेल
कसं संपेल याची....''[७५]

'सरकारी' ह्या कवितेत व्यवहारातला विरोधाभास उपरोधपूर्ण भाषेत आलेला आहे. 'जुनी मोड' ह्या कवितेमध्ये समाजातील मुल्यांची घसरण हास्यास्पद शब्दांमधून व्यक्त झालो आहे. स्त्रीजीवनाचे प्रतिक म्हणून आलेली 'हुतात्मा स्मारक' ही कविता वरवर वाचता झाडाविषयी आहे हे आपल्या लक्षात येते परंतु त्यातील प्रतिमा ह्या स्त्रीजीवनाशी संबंधीत आहेत. म्हणून ही कविता प्रतिकात्मक आहे. येथे झाड हे स्त्रीचे प्रतिक म्हणून आलेले आहे. मानवजातीच्या इतिहासाइतका स्त्री जातीवरील अन्याय सनातन आहे. तिच्या जीवनातला संघर्ष न संपणारा आहे. माणसातील राक्षसी प्रवृत्ती नष्ट होणार नाही. या संदर्भात 'खिंड' ह्या कवितेत अश्विनी धोंगडे म्हणतात,

''जमिनीलाच शाप आहे
विषारी बेण्याचा
रक्तबिंदूतून पुन्हा
रक्त बिंदूच उगवायचा''[७६]

## ३.३. समारोप :

अश्विनी धोंगडे ह्यांच्या 'स्त्रीसूक्त' व 'अन्वय' ह्या दोन कवितासंग्रहामधील कवितांचा अभ्यास करताना हे लक्षात येते की, १९६० पूर्व कवयित्रींच्या व साठोत्तरी कवयित्रींच्या तुलनेत अश्विनी धोंगडे ह्यांचे अनुभवविश्व मोठे व प्रगल्भ आहे. त्यांच्या कवितेचा अभ्यास १. स्त्रीजीवनाचे विविधांगी दर्शन, २. कौटुंबिक नातेसंबंध, ३. नोकरी-व्यवसायातील अनुभव, विवाहसंस्थेतून येणारे अनुभव, ५. स्त्रीपुरूषसंबंध तुलना, ६. स्त्रीमुक्ती चळवळ व स्त्रीवादी जाणिवा-विचार, ७. महानगरीय संवेदना, ८. सामाजिक जाणिवा ह्या आठ प्रकारच्या अनुभवविश्वाच्या आधारे केल्यानंतर असे लक्षात येते की, अश्विनी धोंगडे ह्यांच्या समग्र कवितेतून एकसंघ खंबीरपणे, ठामपणे स्त्रीवादी भूमिका जाणिवा विचार व्यक्त होतात. त्यातून स्त्रीच्या जागृतीचा विचार स्पष्टपणे आलेला आहे. स्त्रीत्वाचे अडसर दूर करून माणूसपणाचा हक्क मिळवणारी स्त्री त्यांच्या काव्यातून दिसते. 'बलात्कार' ह्या कवितेमध्ये स्त्रीजीवनाच्या अवमूल्यनाबद्दलचे कवयित्रीने काढलेले तीव्र उद्‌गार हे अस्वस्थ करणारे आहेत, तर श्वास गुदमरलेल्या अनेक स्त्रियांचे श्वास मुक्त करणारी विमुकता ह्या कवितेमधून दिसून येते. 'आधार' ह्या कवितेमधून नोकरी व्यवसाय करून कुटुंबातील अनेकांचा आधार असणारी स्त्री व तिचा म्हणून 'खास' अनुभव व्यक्त झालेला आहे.

पुरूषप्रधान संस्कृतीला आव्हान देणारी, माणूस म्हणून जगण्यासाठी धडपडणारी स्त्री 'एकदा तरी' ह्या कवितेमध्ये, तसेच अस्तित्वाची परिपूर्ण ओळख झालेली स्त्री 'ओळख' या कवितेमध्ये पहावयास मिळते. 'धन्यो स्त्री जन्म' ह्या कवितेतून स्त्रीवादी भाष्य प्रगट झाले आहे. 'आतबाहेर', 'झापडे', 'मृत', 'मी', 'दु:ख', 'सुसंस्कृत' ह्यासारख्या कवितांमधून स्त्रीमनाचे, दमन, शोषण, घुसमट व्यक्त झाली आहे.

साठोत्तरी मराठी कवयित्रींच्या तुलनेत अश्विनी धोंगडे ह्यांच्या कवितेतून नोकरी व्यवसायातील अनुभव प्रभावीपणे व उत्कटपणे व्यक्त झाले आहेत. 'लोकलमध्ये', 'दिनविशेष', 'यादी', 'गतीची सर्कस', 'सुट्टीचा दिवस', 'तळ्यात मळ्यात', 'शेम ऑन हर', 'देणे', 'फ्लॅटमध्ये', 'स्टॅन्डर्ड' इत्यादी कवितांमधून हे अनुभव परिणामकारकपणे व्यक्त झाले आहेत हे दिसून येते.

कौटुंबिक नातेसंबंधातून येणाऱ्या अनुभवामध्ये 'वाटणी' मधून आईच्या त्यागाची व कपटाची किंमत नसणारी, स्वार्थी नातेसंबंध जपणारी मुले आपण सुखात आहोत, असे भासवणारी आई दिसून येते; तर घरातील सर्वांच्या प्रश्नांना एकाचवेळी उत्तर देणारी स्त्री 'ती एक मिनी कॉम्प्युटर' मध्ये दिसून येते. संसार व नोकरी सांभाळताना घड्याळ्याच्या काट्याबरोबर पळणारी दारबंद फ्लॅट संस्कृतीमुळे समाजापासून दुरावलेली, पारंपारिक आचार-विचार ह्यात गुरफटलेली, कामातून पळवाट काढण्यासाठी देह प्रदर्शनाचा वापर करणारी, नोकरीच्या ठिकाणी होणाऱ्या दमन-शोषण ह्यामुळे घुसमटलेली, आर्थिक स्वातंत्र्य मिळूनही दुःखी असणारी अशी स्त्री अश्विनी धोंगडे ह्यांच्या कवितेतून दिसून येते.

स्त्रीजीवनाचे विविधांगी अनुभव ह्यामध्ये अनेक पातळ्यांवरून होणाऱ्या लुबाडणुकीचे अनुभव प्रामुख्याने 'स्त्री', 'गृहिणी', 'रुपकंवर', 'विटंबना', 'शृंगार', 'मी', 'झापडे', 'कारावास', 'मृत', 'नाते', 'दुःख', 'सुसंस्कृत', 'मरण सोहळा' ह्या कवितामधून शब्दबद्ध झाले आहेत. स्त्रीजीवनाचे बदलते स्वरूप 'गरजा', 'कॅक्टस', 'बॉन्साय', 'स्टॅन्डर्ड', 'स्वतःच्या शरीराची जाणीव', 'शरीर धर्म', 'त्यानंतर', 'स्त्रीजन्म', 'निर्बुद्ध', 'सूर्य', 'स्त्रीजीवनाची मर्यादा', 'नको बाई', 'काठाकाठाने', ह्या कवितामधून पहावयास मिळते.आजच्या समाजातील स्त्रीचे स्थान 'स्वरूप', 'धुंदी', 'वहिवाट', ह्यासारख्या

कवितांमधून लक्षात येते. पारंपारिक विचारांचा पगडा असलेली स्त्री, स्वतःच्या मनाप्रमाणे जगणारी बोलणारी स्त्री 'बायकी' ह्या कवितेतून भेटते. 'गद्यमय' ह्या कवितेतून व्यवहारी स्त्रीचा उत्कृष्ट नमुना पहावयास मिळतो. कृत्रिम तारुण्य टिकवण्याचा आटोकाट प्रयत्न करणारी स्त्री 'बॉन्साय' मधून, विधवा स्त्रीचे दुःख 'दोन मुलाची आई' मधून स्वतःच्या शरीराचा, मनाचा भयानक राग, स्त्रीमनाची निराशा, एकटेपणाचे दुःख प्रामुख्याने 'झिडकारून', 'सरताना', 'त्यानंतर' ह्या कवितांमधून पहावयास मिळते. असे विविध स्वरूपाचे अनुभव अश्विनी धोंगडे ह्यांच्या कवितेतून प्रभावीपणे व्यक्त झाल्याचे लक्षात येते. 'यंत्र', 'विक्री वस्तू', 'छोट्या जाहिराती' ह्यासारख्या कवितामधून विवाह संस्थेतून येणारे कटू अनुभव व्यक्त झाले आहेत, तर 'प्रतिबिंब', 'शंभर वर्षे', 'सुखी संसार', 'बायको', 'संध्याकाळ', 'तू असा!', 'जन्म', 'वास्तव' ह्या कवितामधून स्त्री-पुरुषसंबंधीचे तुलनात्मक अनुभव आलेले दिसून येतात.

महानगरीय संवेदना प्रामुख्याने 'लोकलमध्ये', 'दिनविशेष', 'कॅक्टस', 'गतीची सर्कस', 'फ्लॅटमध्ये', 'देणे', 'गर्दी', 'जीवजंतू' ह्या कवितामधून व्यक्त झाल्याचे लक्षात येते.

अश्विनी धोंगडे ह्यांच्या समग्र कवितेतून सामाजिक आशय व्यक्त झालेला आहे. 'स्त्रीमुक्ती', 'रुपकंवर', 'विटंबना', 'प्रसिद्धी', 'स्वस्त', 'काल आणि आज', 'सुशिक्षितात', 'जीवजंतू', 'गर्दी', 'आसपास', 'हुतात्मा स्मारक', 'सरकारी', 'जुनी मोड', 'स्थितप्रज्ञ आपण सारेच' 'स्वतंत्र', 'थोडे', 'कॅसेट', 'मृत्यू' इत्यादी कवितांमधील सामाजिक आशय व पर्यायाने सामाजिक जाणिवा आपले लक्ष वेधून घेणाऱ्या अशा आहेत. कवयित्री सामाजिक क्रांतीची रोकठोक, स्पष्ट भूमिका घेत नसली तरी त्यांची कविता हे

सामाजिक बदलासाठी केलेले एक प्रकारचे आवाहन आहे असे वाटते नुसत्या स्त्रीस्वातंत्र्याचा नव्हे तर स्त्रीच्या जागृतीचा विचार, स्त्रीवादी जाणिवा, सामाजिक जाणिवा हे सर्व काही कवयित्रीने ठामपणे, जाहीरपणे, स्पष्टपणे, रोकठोकपणे मांडलेले आहे असे दिसून येते.

थोडक्यात अश्विनी धोंगडे ह्यांच्या कविता अभ्यासत असताना प्रथम जाणवतो तो त्यांच्या जीवनाकडे पाहण्याचा स्वतंत्र दृष्टिकोन ह्या स्वतंत्र जीवनविषयक दृष्टीकोनामुळे कवयित्रींचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व तिच्या कवितेतून व्यक्त होते. भोगलेले दु:ख घेतलेला जीवनानंद, दिलेले संघर्ष, पचविलेले संस्कार ह्या स्त्रीजीवनातील सर्व विविधांगी अनुभवांमुळे कवयित्री जीवनाबद्दल, समाजाबद्दल, स्वत:बद्दल स्वतंत्रपणे विचार करू लागते. त्यातूनच तिचा जीवनविषयक दृष्टिकोन प्रगट स्वरूप घेतो. कवयित्रीने स्त्रीजीवनाबद्दलचे, जगण्याबद्दलचे स्वत:चे असे काही चिंतन आपल्या कवितेतून स्पष्टपणे व्यक्त केले आहे. कवयित्रीने सामाजिक बदल घडून येण्यासाठी एक सूक्ष्म बंडच पुकारले आहे आणि शुद्ध क्रांतिवादी भूमिका घेतली आहे. जीवन असे आहे, तसे पत्करणे तिला मान्य नाही. ते मुळातून उखडून टाकावयास हवे, असे तिला वाटते. पारंपारिक, पद्धतीने जीवन जगणाऱ्या स्त्रीचा ती निषेध करते. बाईपणाची धुंदी उतरून तिने माणूस म्हणून जगण्याचा विचार ती धाडसाने मांडताना दिसते. सर्वाथाने विचार केल्यास अश्विनी धोंगडे ह्यांची कविता विकासाच्या दिशेने पावले उचलत आहे असे दिसते. एकूण मराठी कविता समृद्ध करण्यासाठी ही कवयित्री जागरूक आहे, असे ‘स्त्रीसूक्त’ व ‘अन्वय’ मधील कविता, विशेषत: तिच्यातील स्त्रीजीवनाचे आशयविशेष अभ्यासल्या नंतर वाटू लागते.

★★★

## ३.४ संदर्भ व टीपा

(सूचना : जेथे आवृत्तीचा उल्लेख नाही, तेथे प्रथमावृत्ती समजावे)

१. धोंगडे अश्विनी, 'स्त्रीसूक्त', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती : १९९७, अर्पणपत्रिका - वागांभृणी (ऋग्वेद)

२. शिरवळकर सुजाता महाजन, 'स्त्रीसूक्त : सौ. अश्विनी धोंगडे' (लेख), महाराष्ट्र साहित्य पत्रिका, पुणे, जुलै-सप्टेंबर १९८९, अंक २५०, पृ. १०१

३. धोंगडे अश्विनी, 'स्त्रीसूक्त', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती : १९९७, कविता, क्र. १

४. धोंगडे अश्विनी, 'स्त्रीसूक्त', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती : १९९७, प्रस्तावना

५. तत्रैव, पृ. ४

६. तत्रैव, पृ. ३१

७. तत्रैव, पृ. १८

८. तत्रैव, पृ. ३३

९. धोंगडे अश्विनी, 'स्त्रीसूक्त'(लेख), 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', पुणे, दिवाळी १९९०, पृ. १४७

१०. धोंगडे अश्विनी, 'स्त्रीसूक्त', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती : १९९७ पृ. ११

११. तत्रैव, पृ. ३४

१२. तत्रैव, पृ. ४०

१३. तत्रैव, पृ. ४७

१४. तत्रैव, पृ. ३८

१५. धोंगडे अश्विनी, 'अन्वय', दिलीपराज प्रकाशन, पुणे, १९९२, कविता क्र. २

१६. तत्रैव, कविता क्र. ६

१७. तत्रैव, कविता क्र. १०

१८. तत्रैव, कविता क्र. १३

१९. तत्रैव, कविता क्र. १७

२०. तत्रैव, कविता क्र. १८

२१. तत्रैव, कविता क्र. २१

२२. तत्रैव, कविता क्र. २२

२३. धोंगडे अश्विनी, 'स्त्रीसूक्त', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती : १९९७, पृ. ४८

२४. तत्रैव, पृ. २३

२५. तत्रैव, पृ. १४

२६. तत्रैव, पृ. ६०

२७. तत्रैव, पृ. ४३

२८. तत्रैव, पृ. ७३

२९. तत्रैव, पृ. ४५

३०. तत्रैव, पृ. ४१

३१. तत्रैव, पृ. २१

३२. तत्रैव, पृ. २८

३३. तत्रैव, पृ. ५

३४. तत्रैव, पृ. २६

३५. तत्रैव, पृ. ३५

३६. तत्रैव, पृ. ३६

३७. तत्रैव, पृ. ३९

३८. तत्रैव, पृ. ५२

३९. तत्रैव, पृ. ५६

४०. तत्रैव, पृ. ५०

४१. मुदबखे ना. य. 'अस्वस्थकरणारा काव्यसंग्रह : स्त्रीसूक्त', 'गावकरी', १८ सप्टेंबर १९८८, पान दोन.

४२. धोंगडे अश्विनी, 'स्त्रीसूक्त', श्रीविद्या प्रकाशन, द्वितीयावृत्ती : १९९७, पृ. ५९.

४३. तत्रैव, पृ. ३२

४४. तत्रैव, पृ. ६४

४५. तत्रैव, पृ. ४४

४६. तत्रैव, पृ. ५८

४७. तत्रैव, पृ. २०

४८. धोंगडे अश्विनी, 'अन्वय', दिलीपराज प्रकाशन, पुणे, १९९२, कविता क्र. ११

४९. धोंगडे अश्विनी, प्रस्तावना, 'स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप आणि उपयोजन', दिलीपराज प्रकाशन, पुणे, १९९३, पृ. ५.

५०. साने गीता, 'भारतीय स्त्रीजीवन', मौजे प्रकाशन, मुंबई, १९८६, पृ. २३१

५१. गुफा कोकाटे, 'नवभारत' अंक ५, फेब्रुवारी २००५, पृ. ३४

५२. धोंगडे अश्विनी, स्त्रीवादी समीक्षा : 'स्वरूप आणि उपयोजन' दिलीपराज प्रकाशन, पुणे, १९९३, पृ. ६

५३. साठे शारदा, 'स्त्रीवाद : सर्वांग परिपूर्ण तत्त्वज्ञान नव्हे', (लेख), 'शब्दालय', श्रीरामपूर, दिवाळी १९९३, पृ. २७

५४. धोंगडे अश्विनी, 'स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप व उपयोजन', दिलीपराज प्रकाशन, पुणे, १९९३, पृ. ४४.

५५. पहा : गुफा कोकाटे, 'नवभारत' अंक ५, फेब्रुवारी २००५, पृ. ३५

५६. धोंगडे अश्विनी, 'स्त्रीसूक्त', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती : १९९७, पृ. ७

५७. तत्रैव, पृ. २

५८. तत्रैव, पृ. ५५

५९. तत्रैव, पृ. ६६

६०. तत्रैव, पृ. ७२

६१. तत्रैव, पृ. ७१

६२. तत्रैव, पृ. ५५

६३. धोंगडे अश्विनी, 'अन्वय', दिलीपराज प्रकाशन, पुणे, १९९२, कविता क्र. ९

६४. तत्रैव, कविता क्र. ९

६५. तत्रैव, कविता क्र. ११

६६. धोंगडे अश्विनी 'स्त्रीसूक्त', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती : १९९७, पृ. ५

६७. तत्रैव, पृ. २६

६८. धोंगडे अश्विनी, 'अन्वय', दिलीपराज प्रकाशन, पुणे, १९९२, कविता क्र. ३२.

६९. तत्रैव, कविता क्र. ३४

७०. पहा : जाधव रा. ग., 'आधुनिक मराठी कवयित्रींची कविता', प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९६, पृ. १११

७१. पहा : पै शिरीष, संगवई विजया (संपा), प्रस्तावना, 'आव्हान', 'कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९९०, पृ. १९

७२. पहा : तत्रैव, पृ. १९

७३. धोंगडे अश्विनी, 'स्त्रीसूक्त' श्रीविद्या प्रकाशन पुणे, द्वितीयावृत्ती : १९९७, पृ. ३१

७४. तत्रैव, पृ. ७

७५. धोंगडे अश्विनी, 'अन्वय', दिलीपराज प्रकाशन, पुणे, १९९२, कविता क्र. ४८

७६. तत्रैव, कविता क्र. ४४